अहवाल क्रमांक : १८९

सत्यमेव जयते

# पंचायती राज समिती

## (२०२०-२०२१)

## (चौदावी महाराष्ट्र विधानसभा)

**सांगली जिल्हा परिषदेच्या सन २०१२-२०१३ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भातील**

# दहावा अहवाल

**(सदर अहवाल दिनांक २८ डिसेंबर, २०२१ रोजी विधानसभेस/विधानपरिषदेस सादर करण्यात आला.)**

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई
२०२१

# पंचायती राज समिती

## (२०२०-२०२१)

## (चौदावी महाराष्ट्र विधानसभा)

### सांगली जिल्हा परिषदेच्या सन २०१२-२०१३ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भातील

# दहावा अहवाल

## पंचायती राज समिती

(सन २०२०-२०२१)

**समिती प्रमुख :**

(१) श्री. संजय रायमुलकर, वि.स.स.

**सदस्य :**

(२) श्री. प्रदीप जैस्वाल, वि.स.स.

(३) श्री. कैलास पाटील (घाडगे), वि.स.स.

(४) डॉ. राहुल पाटील, वि.स.स.

(५) श्री. अनिल पाटील, वि.स.स.

(६) श्री. संग्राम जगताप, वि.स.स.

(७) श्री. दिलीपराव बनकर, वि.स.स.

(८) श्री. शेखर निकम, वि.स.स.

(९) श्री. सुभाष धोटे, वि.स.स.

(१०) श्री. माधवराव पवार, वि.स.स.

(११) श्रीमती प्रतिभा धानोरकर, वि.स.स.

(१२) श्री. हरिभाऊ बागडे, वि.स.स.

(१३) डॉ. विजयकुमार गावीत, वि.स.स.

(१४) डॉ. देवराव होळी, वि.स.स.

(१५) श्री. कृष्णा गजबे, वि.स.स.

(१६) *श्री. विजय रहांगडाले, वि.स.स.

(१७) श्री. राणा जगजितसिंह पाटील, वि.स.स.

(१८) श्री. प्रशांत बंब, वि.स.स.

(१९) श्रीमती मेघना बोर्डीकर-साकोरे, वि.स.स.

(२०) श्री. किशोर जोरगेवार , वि.स.स.

(२१) श्री. अंबादास दानवे, वि.प.स.

(२२) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

(२३) श्री. अमरनाथ राजूरकर, वि.प.स.

(२४) श्री. निरंजन डावखरे, वि.प.स.

(२५) श्री. सुरेश धस, वि.प.स.

**विशेष निमंत्रित :**

(२६) श्री. किशोर आप्पा पाटील, वि.स.स.

(२७) श्री. जयंत पाटील, वि.प.स.

(२८) श्री. बाळाराम पाटील, वि.प.स.

(२९) श्री. किशोर दराडे, वि.प.स.

(३०) श्री. रत्नाकर गुट्टे, वि.प.स.

(३१) श्री. महादेव जानकर, वि.प.स.

(३२) श्री. सदाशिव खोत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. राजेन्द्र भागवत, प्रधान सचिव

(२) श्री. विलास आठवले, उप सचिव

(३) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव

(४) श्री. प्रकाश थिटे, कक्ष अधिकारी

(५) श्रीमती सुषमा लोंढे, कक्ष अधिकारी.

*डॉ. संजय कुटे, वि.स.स. यांनी समिती सदस्य पदाचा राजीनामा दिल्यामुळे त्यांच्या रिक्त झालेल्या जागेवर श्री. विजय रहांगडाले, वि.स.स. यांची समिती सदस्य म्हणून दिनांक १३ ऑक्टोबर, २०२१ रोजीपासून नामनियुक्ती केलेली आहे.

## पंचायती राज समिती

(सन २०१७-२०१८)

**समिती प्रमुख :**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स.

**सदस्य :**

(२) श्री. बाबुराव पाचर्णे, वि.स.स.

(३) श्री. चरण वाघमारे, वि.स.स.

(४) श्री. रणधीर सावरकर, वि.स.स.

(५) ॲड. राहुल कुल, वि.स.स.

(६) श्री. आर.टी.देशमुख, वि.स.स.

(७) डॉ. देवराव होळी, वि.स.स.

(८) डॉ. सुरेश (भाऊ) खाडे, वि.स.स.

(९) डॉ. सुधाकर भालेराव, वि.स.स.

(१०) श्री. सुधाकर कोहळे, वि.स.स.

(११) श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.

(१२) श्री. किशोर पाटील, वि.स.स.

(१३) श्री. राजेश क्षीरसागर, वि.स.स.

(१४) श्री. तुकाराम काते, वि.स.स.

(१५) श्री. राहुल बोंद्रे, वि.स.स.

(१६) श्री. भारत भालके, वि.स.स.

(१७) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.

(१८) श्री. दिलीप सोपल, वि.स.स.

(१९) श्री. राहुल मोटे, वि.स.स.

(२०) श्री. दीपक चव्हाण, वि.स.स.

(२१) श्री. प्रविण दरेकर, वि.प.स.

(२२) प्रा. डॉ. तानाजी सावंत, वि.प.स.

(२३) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

(२४) श्री. सतीश चव्हाण, वि.प.स.

(२५) श्री. अमरनाथ राजूरकर, वि.प.स.

**विशेष निमंत्रित :**

(२६) श्री. बाळाराम पाटील, वि.प.स.

(२७) श्री. श्रीकांत देशपांडे, वि.प.स.

(२८) श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.

(२९) श्री. किशोर दराडे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. जितेंद्र भोळे, सचिव (कार्यभार)

(२) श्री. विलास आठवले, सह सचिव (२) (का.)

(३) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव

(४) श्री. मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी

**प्रस्तावना**

मी, पंचायती राज समितीचा "समिती प्रमुख" या नात्याने समितीने अधिकार दिल्यावरून पंचायती राज समितीचा दहावा अहवाल सादर करीत आहे.

सन २०२०-२०२१ या वर्षाकरिता समिती दिनांक १३ जानेवारी, २०२१ रोजी गठीत झाली. महाराष्ट्र विधानसभा नियमावलीतील नियम २४० अन्वये विधानमंडळाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या जिल्हा परिषदांच्या वार्षिक प्रशासन अहवालाची तसेच महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या लेख्यांवरील लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवाल व एकत्रित वित्तीय महसुली लेखे यांच्या परीक्षणाची कामे प्रामुख्याने या समितीकडे सोपविण्यात आलेली आहेत.

शासनाच्या विविध कामकाजाचा वाढलेला व्याप (Enormous range and complexity) लक्षात घेता विधानमंडळाला उपलब्ध वेळेत आपली कर्तव्ये पुरेशा क्षमतेने बजावता येणे अशक्य झाले आहे. शासन यंत्रणेकडे उक्त किचकट प्रशासकीय कामासाठी सक्षम व तज्ज्ञ प्रशासक यंत्रणा उपलब्ध असते. संसदीय लोकशाहीच्या संवर्धनासाठी व यशस्वीतेसाठी शासनाच्या संपूर्ण प्रशासन व्यवस्थेवर सखोल, संपूर्ण, प्रभावी व अर्थपूर्ण असे (effective meaningful) नियंत्रण व देखरेख ठेवण्याची आत्यंतिक गरज आहे आणि म्हणूनच कार्यकारी प्रशासन (Executive) राबवित असलेल्या विविध योजनांचा अभ्यास करण्यासाठी, त्यातील त्रुटी शोधून काढून योजना अंमलबजावणीला व पर्यायाने प्रशासनाला गती देण्यासाठी (Tone of administration) मा.सभापती, विधानपरिषद व मा.अध्यक्ष, विधानसभा यांनी दोन्ही सभागृहाच्या निवडक सदस्यांचा समावेश असलेल्या पंचायती राज समितीचे गठन दिनांक १३ जानेवारी, २०२१ रोजी केले. समिती पद्धतीचे वैशिष्ट असे की, सभागृहात पक्षीय ध्येयधोरणांचा सदस्यांवर प्रभाव पडतो. त्या उलट संसदीय लोकशाही पद्धतीमध्ये विधानमंडळाची ही समिती फार मोठ्या मोलाचे कार्य पार पाडीत आहे. ही समिती विधानमंडळाची निर्मिती असून ती साहजिकच विधानमंडळास दुय्यम आहे. या समितीला सर्व अधिकार विधानमंडळापासूनच प्राप्त झालेले आहेत. (They derive authority from the Legislature) या समितीला "Mini Legislature" सभागृहाची छोटी प्रतिकृती संबोधली जाते. शासनाने राबविलेल्या योजनांच्या अंमलबजावणीला पर्यायाने प्रशासनाला गती देण्यासाठी व प्रशासनावर सातत्याने नियंत्रण व प्रभावीपणे पहारा ठेवण्याचे महत्त्वाचे काम विधानमंडळाच्या या समितीद्वारे केले जाते. समितीचे कामकाज पक्षविरहीत तत्त्वावर (irrespective of party affiliation) चालत असल्यामुळे समिती समोरील बाबी पक्षीय अभिनिवेशरहीत पद्धतीने (Non-Party Basis) विचारात घेण्यात येतात त्यामुळे एखाद्या विषयाचा अभ्यास अत्यंत निःपक्षपातीपणे व तपशिलात जाऊन केला जातो. परिणामी त्यास पूर्ण न्याय मिळतो.

शासनाचे एखादे धोरण वा योजना याची आखणी कशी करावी याबाबत समिती सल्ला देऊ शकणार नाही, तथापि शासनाने अंमलात आणलेल्या धोरणांची वा योजनेची फलश्रुती अपेक्षेप्रमाणे होत नसेल वा होणार नसेल तर ही बाब संबंधित समिती सभागृहाच्या नजरेस आणून त्या धोरणात वा योजनेत बदल करण्यासंबंधी शासनास सुचविण्याचे काम करते. समिती पद्धतीचा हा एक विशेष फायदा आहे.

विधिमंडळाप्रती शासनाची जबाबदारी ही मर्यादित स्वरूपाची आहे. संसदीय लोकशाहीमध्ये शासन हे प्रत्येक बाबतीत विधानमंडळाला सर्वतोपरी जबाबदार असते आणि शासनाच्या संपूर्ण प्रशासनावर विधीमंडळाचे नियंत्रण हा संसदीय लोकशाहीचा आत्मा आहे.

समितीचे अधिकार, कार्यकक्षा, प्रशासनावर ठेवावयाचे नियंत्रण, शासनाचे समितीप्रती व विधानमंडळाप्रती असलेले उत्तरदायित्व या सर्वांचा साकल्याने विचार केल्यास समितीचे अधिकार निश्चित व निर्विवादपणे सर्वश्रेष्ठ आहेत. परंतु, योजना राबविण्यापूर्वी वा एखादे धोरण आखण्यापूर्वी प्रशासन यंत्रणेने मंत्रिमंडळाला दिलेल्या सल्ल्याची तपासणी करणे निश्चितच समितीच्या कार्यकक्षेबाहेरील होईल. मात्र योजना अस्तित्वात आल्यानंतर व त्यावर आर्थिक तरतूद करण्यात आल्यानंतर समिती या प्रकरणी संपूर्णपणे व तपशिलवार छाननी करण्यास समर्थ ठरेल. ही योजना अगदी अनावश्यक आहे काय, त्यावर अपेक्षेपेक्षा जास्त खर्च करण्यात आला आहे काय ? योजनेची उद्दीष्टे साध्य झाली आहेत काय ? योजना आर्थिकदृष्ट्या सक्षम आहे किंवा कसे, इतकेच काय एखादी योजना आर्थिकदृष्ट्या सक्षम नसल्यास ती बंद करण्यात यावी व त्याऐवजी दुसरी एखादी योजना आखण्यात यावी या मर्यादेपर्यंत सुद्धा समिती शिफारस करू शकते व त्या अनुषंगाने आवश्यक ती सर्व माहिती समितीला मागविण्याचा अधिकार आहे.

समित्यांचे कामकाज अधिक परिणामकारक करण्यासाठी मा.सदस्यांनी समितीच्या कामात जास्तीत जास्त सहभाग घेणे जरुरीचे आहे. या अहवालात नमूद बाबीसंदर्भात समितीने एक एक प्रश्न हाती घेऊन त्या प्रत्येक प्रश्नावर समाधानकारकरीतीने साक्षीपुरावा गोळा केला, तसेच मा. समिती सदस्यांनी आळीपाळीने प्रश्न विचारून संबंधित अधिकाऱ्यांकडून माहिती मिळविण्याच्या विनिर्दिष्ट पद्धतीचे पालनसुद्धा भेटीच्या वेळी केलेले आहे. एका सदस्यांनी त्यांचा मुद्दा पूर्ण केल्यानंतरच दुसऱ्या सदस्यांनी माहिती विचारण्याची पद्धत जोपासली आहे. या पद्धतीने समितीचे कामकाज सुव्यवस्थित पद्धतीने चालविण्याचा या समितीने प्रयत्न केलेला आहे.

समितीला तिच्याकडे सोपविण्यात आलेल्या विषयावरील मुद्दे तयार करून आणि त्यांच्या विनिर्दिष्ट क्रमाने त्यांचे परिक्षण करून विषयाशी संबंधित नियम किंवा कार्यपद्धतीमधील त्रुटी आणि उणीवा शोधून काढतेवेळी समितीचा दृष्टीकोन वस्तुनिष्ठ व विधायक होता. केलेल्या चुका सुधारण्यासाठी किंवा प्रशासकीय पद्धतीत सुधारणा घडविण्याच्यादृष्टीने समितीने अनेक बाबतीत सुधारणात्मक उपाय सुचविलेले आहेत, चुकांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी देखील समितीने उपाययोजना सुचविलेल्या आहेत. शासनाच्या प्रतिनिधीप्रती सदस्यांचे वर्तन संयमी आणि सौजन्यशील ठेवून कोणताही साक्षीदार काही वस्तुस्थिती लपवित असल्याबद्दल दोषी असल्याचे किंवा असहकार दर्शवित असल्याचे आढळून आल्यानंतर समितीने संबंधितांविरुद्ध कारवाईदेखील सुचविली आहे. समितीची बैठक बोलविणे आणि साक्षीदारांना साक्षीसाठी बोलविणे यासंबंधीच्या इतर किरकोळ मुद्दयांच्या बाबतीत साक्षीदारांना पुरेसा वेळ देऊन व नोटीस देऊन बोलविण्यात आलेले आहे. थोडक्यात, समिती पद्धती ही अत्यंत उपयुक्त व परिणामकारक असून संसदीय कामकाज प्रणालीमध्ये या पद्धतीचे स्थान व महत्त्व अनन्यसाधारण असेच आहे. संसदीय शासन प्रणाली अधिकाधिक वृद्धिंगत करण्याच्या दृष्टीने या महत्त्वपूर्ण अशा संसदीय समितीच्या कामकाजाचा स्तर उत्तरोत्तर उंचावत नेणे ही आपणा सर्वांची जबाबदारी आहे.

राज्यात समिती जिल्हा परिषदांना भेटी देत असताना समितीला अनेक चांगल्या संकल्पना व राबविलेल्या योजना आढळून आल्या आहेत. त्याचप्रमाणे काही बाबतीत प्रचंड अनियमितता व गैरव्यवहाराची प्रकरणेदेखील आढळून आली आहेत. समितीने चांगल्या बाबींना समर्थन देऊन संबंधितांना प्रोत्साहन दिले. तद्वतच काही अनियमितता किंवा गैरव्यवहाराच्या प्रकरणात समितीने कठोरपणे निर्णयदेखील घेतले आहेत. असे करीत असताना दोषारोपित व्यक्तीवर कारवाई करताना नैसर्गिक न्यायाची पायमल्ली होऊ नये अशा प्रकारच्या सूचनादेखील प्रशासनास केल्या आहेत. लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध करून न देणे अशी असंख्य प्रकरणे समितीला आढळून आली. अशा प्रकरणी समितीने कोणताही मुलाहिजा न ठेवता संबंधितांवर मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियमातील तरतुदीनुसार दंडात्मक कारवाईदेखील प्रस्तावित केली आहे. या माध्यमातून शासनखाती दंडाची रक्कम जमा होत असताना संबंधित कर्मचाऱ्यांना जरबदेखील बसविण्याचे काम समितीने केले आहे.

या समितीने ज्या ज्या जिल्ह्यांना भेटी दिल्या आहेत त्या त्या जिल्ह्यातील सर्व पंचायत समित्यांना भेटी देऊन उक्त पंचायत समित्यांच्या प्रशासनिक अहवालावर सखोल चर्चा करून ज्या बाबतीत दोष आहेत त्या सुधारून घेण्याबाबत त्यांना उपयुक्त सूचना केल्या आहेत. तसेच पंचायत समित्यांच्या क्षेत्रातील विविध कामांना भेटी देऊन त्याची पाहणी करणे, शालेय पोषण आहार, पुरक पोषण आहार, सार्वजनिक आरोग्य केंद्रे/उपकेंद्रे, पशु वैद्यकीय दवाखाने, रस्ते, जलसिंचनाची कामे, पाणीपुरवठ्याची कामे इत्यादींना भेटी देऊन त्याबाबतही चुकांचे निरसन करून काही चांगल्या बाबींचे समर्थन करून संबंधितांना प्रोत्साहितदेखील केले आहे. या अहवालात अशा अनेक बाबींचा उहापोह केला आहे.

सन २०११-१२ या वर्षाच्या लेखा परीक्षा पुनर्विलोकन व सन २०१२-१३ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात सन २०१७-१८ साठी गठीत झालेल्या समितीने सांगली जिल्हा परिषदेची सखोल तपासणी केली. समितीने सांगली जिल्हा परिषदेस दिनांक २२, २३ व २४ नोव्हेंबर, २०१७ रोजी भेट देऊन श्री. अभिजित राऊत मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधित अधिकारी यांची साक्ष घेतली.

सन २०१७-२०१८ या वर्षाकरिता गठीत झालेल्या समितीने सांगली जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या तसेच साक्षीच्या वेळी संबंधित अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीच्या आधारे उपस्थित झालेल्या मुद्द्यांबाबत अधिक माहिती जाणून घेण्याच्या दृष्टीने दिनांक १६ ऑक्टोबर, २०१८ व सन २०२०-२१ या वर्षाकरिता गठित झालेल्या समितीने दिनांक २७ जानेवारी, २०२१ रोजी जिल्हा परिषद, सांगली संदर्भात मंत्रालयीन विभागीय सचिवांच्या/प्रतिनिधींच्या साक्षी घेतल्या.

मंत्रालयीन विभागीय सचिवांचे साक्षीचेवेळी श्री. श्यामलाल गोयल, अपर मुख्य सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, श्रीमती वंदना कृष्णा, अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग, श्री. संजय चहांदे, अपर मुख्य सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, श्री. अनुप कुमार, प्रधान सचिव, कृषी व पदुम विभाग, श्रीमती निलिमा करेकट्टा, प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, श्री. श्याम तागडे, प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, श्री. असिमकुमार गुप्ता, सचिव, ग्रामविकास विभाग, श्री. एकनाथ डवले, सचिव, कृषी विभाग, श्री. विवेक नाईक, सचिव, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना, ग्रामविकास विभाग, श्रीमती विनिता वेद सिंगल, सचिव, महिला व बालविकास विभाग, श्रीमती आय ए कुन्दन, सचिव, महिला व बालविकास विभाग, श्री.ला.रा.गुजर, सह सचिव, महिला व बालविकास विभाग, श्री. मनोहर ठोंबरे, सहसचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, श्री. संजय बनकर, उप सचिव, ग्रामविकास विभाग, श्री. युवराज अजेटराव, उप सचिव, गृह विभाग, श्री. किरण पाटील, उप सचिव, कृषी विभाग, श्री. म. रं. शेळके, उप सचिव, मृद व जलसंधारण विभाग, श्री. दि. मा. सोनवणे, उप सचिव, अल्पसंख्याक विकास विभाग, श्री. रविंद्र गुरव, उप सचिव, पशुसंवर्धन विभाग, श्री. कांतीलाल उमाप, आयुक्त, पशुसंवर्धन विभाग तसेच श्री. प्रताप मोहिते/संजय शहा, संचालक, स्थानिक लेखा निधी संचालनालय, नवी मुंबई यांनी समितीच्या बैठकींना उपस्थित राहून समितीच्या कामकाजात केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांची आभारी आहे. तसेच जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधित अधिकारी यांनी साक्षीच्या वेळी समितीला माहिती पुरवून केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांचीही आभारी आहे.

समितीने कामकाजाचे संक्षिप्त कार्यवृत्त परिशिष्टामध्ये दिले आहे.

वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात समितीने भेटी दिलेल्या सांगली जिल्हा परिषदेच्या कामकाजाची तपासणी करीत असताना समितीला आढळून आलेल्या काही मुद्दयांबाबत समितीचे अभिप्राय व शिफारशी अहवालात देण्यात आल्या आहेत.

सन २०२०-२०२१ साठी नव्याने गठीत झालेल्या समितीने दिनांक २४ डिसेंबर, २०२१ रोजीच्या बैठकीत प्रारुप अहवाल विचारात घेऊन तो किरकोळ दुरुस्तींसह संमत केला.

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक : २४ डिसेंबर, २०२१.

**संजय रायमुलकर,**
समिती प्रमुख,
पंचायती राज समिती.

## अनुक्रमणिका


| अ.क्र. | प्रकरण क्रमांक | विषय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| (१) | एक | खाते प्रमुखांनी पंचायत समित्यांना भेटी देण्याबाबत (पंचायत समिती, वाळवा) | १ |
| (२) | दोन | पंचायत समिती, शिराळा/पलूस येथे ग्रामसेवक, अधिकारी/कर्मचारी, मुख्यालयी राहत नसल्याबाबत | ४ |
| (३) | तीन | बनावट स्वाक्षरी करून केलेला अपहार (पंचायत समिती, मिरज) | ९ |
| (४) | चार | अंदाजपत्रकानुसार रस्त्याचे व नालीचे बांधकाम न केल्याबाबत (पंचायत समिती, तासगाव) | १२ |
| (५) | पाच | राष्ट्रीय पेयजल योजनेअंतर्गत पाणी पुरवठा योजनेच्या कामाबाबत (पंचायत समिती, जत) | १५ |
| (६) | सहा | सौर कंदील व नॅपसॅक स्प्रेअर वाटपाबाबत (पंचायत समिती, कवठेमहांकाळ) | १८ |
| (७) | सात | अंगणवाडी सेविकांच्या रिक्त पदांबाबत | २१ |
| | | **परिशिष्ट**<br>**समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त** | |

प्रकरण एक

## जिल्हा परिषद, सांगली (प्रशासन)

## खाते प्रमुखांनी पंचायत समित्यांना भेटी देण्याबाबत

## (पंचायत समिती, वाळवा)

पंचायती राज समितीने दिनांक २२ ते २४ नोव्हेंबर, २०१७ या कालावधीत सांगली जिल्हा परिषदेस भेट दिली असता सन २०१२-१३ या वर्षाच्या प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान सांगली जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने अशी विचारणा केली की, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, कार्यकारी अभियंता, उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यासह जे अन्य खातेप्रमुख आहेत त्यांनी पंचायत समितीला किती भेटी दिल्या व भेटी कमी देण्याचे कारण काय आहे, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विशद केले की, खातेप्रमुखांनी दर महिन्याला एका पंचायत समितीला भेट द्यायला पाहिजे. खातेप्रमुखांच्या किमान ६ भेटी अपेक्षित आहे, यावर समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांना पुढीलप्रमाणे निदेश दिले की, खातेप्रमुखांनी दर महिन्याला पंचायत समितीला भेट दिली पाहिजे म्हणजे वर्षातून १२ भेटी दिल्या पाहिजेत. उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि) यांनी वर्षातून २ वेळा, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.) यांनी वर्षातून २ वेळा, कार्यकारी अभियंता (इ. व द.) यांनी वर्षातून ४ वेळा भेटी दिलेल्या आहेत, तर कार्यकारी अभियंता, उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी भेटी दिलेल्या नाहीत. खातेप्रमुखांनी शासनाच्या निकषाप्रमाणे भेटी दिलेल्या नाहीत. त्यांनी शासन निर्णयाचे उल्लंघन केले आहे. त्यामुळे हे सर्व खातेप्रमुख कारवाईस पात्र आहेत. या सर्व अधिकाऱ्यांनी शासनाच्या निर्णयाचे उल्लंघन केले. तसेच ज्या खातेप्रमुखांनी शासनाच्या निदेशानुसार पंचायत समितीला भेटी दिलेल्या नाही त्या सर्व खातेप्रमुखांची १ वेतनवाढ एका वर्षासाठी रोखण्यात यावी व त्याची नोंद त्यांच्या सेवापुस्तिकेमध्ये घ्यावी आणि यासंबंधीचा अहवाल समितीला सादर करावा. यावर संपूर्ण जिल्ह्यातील अहवाल समितीला सादर करतो असे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला आश्वासन दिले. यावर समितीने गट विकास अधिकारी यांना विचारले की, सध्याच्या भेटीची सद्यस्थिती काय आहे, यावर गटविकास अधिकारी पंचायत समिती, वाळवा यांनी भेटीच्या सद्यस्थितीबाबत तपशिल समितीला सादर केला. आपल्या मासिक सभा किती झाल्या आहेत, असा प्रश्न समितीने विचारला असता १२ मासिक सभा झालेल्या आहेत. असे उत्तर गट विकास अधिकारी, पंचायत समिती वाळवा यांनी समितीला दिले. पुढे समितीने असे निदर्शनास आणून दिले की, मासिक सभेला आपले अधिकारी जात नाही ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळेच शेवटच्या माणसाला शासनाच्या योजनेचा लाभ मिळत नाही. आपले काम बरोबर होत नसेल तर शासन गतिमान कसे काय होणार, तेव्हा शासन गतिमान होण्यासाठी आपणदेखील काम करणे आवश्यक आहे. तसेच खातेप्रमुखांनी भेटी न देणे ही गंभीर बाब आहे. समितीकडे कासेगाव ग्रामपंचायती संबंधात तक्रार आलेली आहे. त्यात सन २००७ पासून आज अखरेपर्यंत रोजगार हमी योजनेच्या कामाचा लाभ देण्यात आला नाही, १३ वा वित्त आयोग बँक खाते, सरपंच बदल होऊनही ज्यांचा ग्रामपंचायतीशी काहीही संबंध नाही अशा व्यक्तीच्या नावे बँक खाते करून गैरव्यवहार करण्यात आला आहे, जलस्वराज्य योजनेत बनावट देयके दाखवून लाखो रुपयाचा गैरव्यवहार करण्यात आला आहे, या तक्रारीकडे गट विकास अधिकारी यांनी दुर्लक्ष केले आहे, आठवडा बाजाराचा कर जादा जमा करणे अशा प्रकारच्या तक्रारी आहेत. तेव्हा या तक्रारीची आपण चौकशी करावी, असे समितीने निदेश दिले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

खाते प्रमुखांनी पंचायत समित्यांना भेटी देण्याबाबत (पंचायत समिती वाळवा) :— जिल्हा परिषदेच्या खातेप्रमुखांनी शासनाच्या निकषाप्रमाणे पंचायत समित्यांनी भेटी देणे आवश्यक आहे. तथापि, शासन निर्णयाचे उल्लंघन झालेले आहे, त्यामुळे ज्या खातेप्रमुखांनी शासनाच्या निदेशानुसार भेटी दिलेल्या नाहीत अशा अधिकाऱ्यांविरूद्ध कोणती कारवाई करण्यात आली आहे.

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

पंचायती राज समितीने दिलेल्या निर्देशानुसार शासन निर्देशाप्रमाणे पंचायत समित्यांना विहित भेट न देणाऱ्या श्री. एस.जी.सादिलगे, तत्कालिन कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा यांचेविरुद्ध प्रशासकीय कारवाई करण्याबाबतचा प्रस्ताव दिनांक २४ सप्टेंबर २०१८ अन्वये मा.सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना सादर करण्यात आला आहे.

### मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

संबंधित कर्मचारी हे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे कर्मचारी आहेत. या कर्मचाऱ्यांविरुद्ध प्रशासकीय कारवाई करण्यास प्राधिकरण सक्षम आहे. श्री. सादिगले हे दिनांक ३१ मे २०१८ रोजी सेवानिवृत्त झाले आहेत. त्यांचेविरुद्ध ज्या कारणासाठी शिस्तभंगाची कार्यवाही प्रस्तावित आहे, ती घटना सन २०१३-१४ मधील आहे. सदर घटना चारपेक्षा अधिक वर्षांच्या कालावधीत घडलेली असल्याने श्री. सादिगले यांच्याविरुद्ध महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ मध्ये नियम २७ (२) (बी) (दोन) मधील, तरतुदीनुसार शिस्तभंगाची कार्यवाही करता येणार नाही असे प्राधिकरणाने कळविले आहे.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने सांगली जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्द्यावर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक २७ जानेवारी, २०२१ रोजी विभागीय सचिवांची साक्ष आयोजित करण्यात आली. साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, जिल्हा परिषदेच्या खाते प्रमुखांनी शासनाच्या निकषाप्रमाणे पंचायत समितीला भेटी देणे आवश्यक आहे. तथापि, शासन निर्णयाचे उल्लंघन झालेले आहे. त्यामुळे ज्या खातेप्रमुखांनी शासनाच्या निर्णयानुसार भेटी दिलेल्या नाहीत. अशा अधिकाऱ्यांविरुद्ध कोणती कारवाई करण्यात आली, त्याबाबत असे उत्तर देण्यात आले आहे की, खाते प्रमुखांविरुद्ध प्रशासकीय कारवाई करण्याचा प्रस्ताव संबंधित प्रशासकीय विभागाला सादर करण्यात आला आहे. याबाबत नेमकी काय कारवाई करण्यात आली. यावर प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, यांनी समितीस पुढीलप्रमाणे माहिती दिली की, सांगली जिल्हा परिषद येथे जिल्हा आरोग्य अधिकारी श्री. अभिमन्यू खरे होते. त्यांच्याबाबत तक्रार आली होती की, सन २०१२-१३ मध्ये त्यांनी पंचायत समितीला फक्त एक भेट दिली होती. सन २०१७ मध्ये समितीने भेट दिल्यावर समितीचे इतिवृत्त सन २०१८ मध्ये प्राप्त झाले. त्यानंतर सन २०१८ मध्ये चौकशी सुरू करण्यात आली. त्यावेळी सदर अधिकारी यापूर्वीच सेवानिवृत्त झाले होते. महाराष्ट्र नागरी सेवा निवृत्ती वेतन नियम, १९८२ मधील नियम २७ (२) मधील (ब) (२) नुसार तसेच विभागीय नियम पुस्तिका प्रकरण १२ मधील नियम १२.३.१ (ड) मध्ये अशी तरतूद आहे की, कारवाई सुरू करण्यापूर्वी सदर प्रकरण चार वर्षांपूर्वीचे असेल तर संबंधितांवर कारवाई करता येत नाही. त्यामुळे सदर प्रकरण शासनस्तरावर बंद करण्यात आले आहे. हे प्रकरण सन २०१२-१३ चे होते व कारवाई सन २०१८ मध्ये सुरू करण्यात आली होती. यावर समितीने या प्रकरणात जो विलंब झालेला आहे तो जाणूनबुजून करण्यात आला आहे काय, वेळेत कारवाई करणे अपेक्षित असताना कारवाई करण्यास उशीर होण्याची कारणे काय आहे असा प्रश्न विचारला असता यावर प्रधान सचिव सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी असे विशद केले की, स्वतःहून उशीर करण्यात आलेला नाही. याबाबत जास्त माहिती सांगता येणार नाही. सदर प्रकरण २०१२-१३ मधील आहे. माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये समितीचा दौरा झाला होता. समितीचे इतिवृत्त सन २०१८ मध्ये प्राप्त झाले होते. त्यानंतर कारवाई सुरू केली तेव्हा संबंधित अधिकारी श्री. खरे, माहे जानेवारी, २०१८ मध्ये सेवानिवृत्त झाले होते. यावर समितीने विचारणा केली की, समितीचे इतिवृत्त सन २०१८ मध्ये प्राप्त झाले आहे. कारवाई करण्यास इतका उशीर का झाला सदर प्रकरण सन २०१२-१३ मधील आहे. सन २०१७ मध्ये समितीने भेट दिली व या संदर्भातील कार्यवृत्त सन २०१८ मध्ये प्राप्त झाले म्हणून त्या अधिकाऱ्यावर आता कारवाई करण्यात येत नाही. संबंधित अधिकारी सेवानिवृत्त झाला असला तरी सेवानिवृत्तीनंतर त्या अधिकाऱ्यांवर काय निर्बंध लावण्यात आले आहेत. असा समितीने आक्षेप घेत विचारणा केली असता, प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी समितीस सांगितले की, सदर अधिकारी जानेवारी, २०१८ मध्ये सेवानिवृत्त झाले आहेत. त्यामुळे त्यांच्यावर कोणतेही निर्बंध लावता येत नाहीत. यासंदर्भात अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस सांगितले की, लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवाल सन २०१२-२०१३ चा होता. समितीने सन २०१७ मध्ये भेट दिली व सन २०१८ मध्ये समितीचे कार्यवृत्त प्राप्त झाले. चार वर्षापूर्वीचे प्रकरण असल्यामुळे कारवाई करता येत नाही.

यावर समितीने विचारणा केली की, सन २०१२-१३ चे प्रकरण होते, समितीच्या निदर्शनास सन २०१७ मध्ये आले त्या अगोदर संबंधित विभाग प्रमुखांनी चौकशी का केली नाही, त्यांची ती जबाबदारी नव्हती काय, माननीय सर्वोच्च न्यायालयाचे जज्जमेंट असे आहे की, सेवा निवृत्त होऊन चार वर्षे झाले की, संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करता येत नाही. या प्रकरणाला उशीर करण्याचे कारण हे देखील असू शकते. प्रथमदर्शनी असेच दिसते की, चार वर्षे होऊ द्या. त्यानंतर कारवाई करता येणार नाही. ज्या दिवशी हे प्रकरण उघडकीस आले त्यावेळी संबंधित विभाग प्रमुख किंवा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी कारवाई करणे आवश्यक होते. त्यांची ती जबाबदारी होती. सेवानिवृत्त होईपर्यंत कारवाई केली नाही असे दिसून येते. यावर समितीने निदर्शनास आणून दिले तेव्हाच ही बाब निदर्शनास आली काय, त्या अगोदर ही बाब निदर्शनास का आली नाही. या प्रकरणात शासन निर्णयाचे उल्लंघन झाले आहे. त्यानुसार खाते प्रमुखांनी पंचायत समितीच्या बैठकीला भेटी दिलेल्या नाहीत. एखाद्या खाते प्रमुखांने तालुक्याच्या दवाखान्याला भेटी दिलेल्या नाहीत इतकाच आक्षेप आहे की, यामध्ये काही गैरप्रकार झालेला आहे. अशी समितीने नाराजी व्यक्त करीत विचारणा केली असता अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस असे सांगितले की, लेखा परिच्छेद आला तेव्हा हे प्रकरण उघडकीस आले. त्या अगोदर यासंदर्भातील माहिती नव्हती. तसेच पंचायत समितीच्या मासिक बैठकांना अधिकारी उपस्थित राहिले नाहीत असा आक्षेप आहे. पंचायत समितीला एका वर्षात १० भेटी द्यायच्या असतात तर संबंधित अधिकाऱ्यांनी पाच भेटी दिलेल्या आहेत हा आक्षेप आहे. समितीचे म्हणणे असे आहे की, भेटी दिल्या नाहीत हा मुद्दा चौकशी करण्यासाठी किती पुरेसा आहे. त्या ठिकाणी गैरप्रकार झाला, शासनाचे काही नुकसान झाले, एखाद्या पेशंटचे नुकसान झाले, खरेदीत काही अनियमितता झाली. असे असेल तर अशा व्यक्तीवर कडक कारवाई होणे आवश्यक आहे. एखाद्या वेळी वेगळ्या कारणाने तो त्या ठिकाणी जाऊ शकला नाही. भेट दिलेली नाही हा आक्षेप आक्षेपार्ह आहे काय, यावर शासन निर्णयानुसार कार्यवाही झालेली नाही. असे अतिरिक्त मुख्य अधिकारी यांच्याकडून समितीस सांगण्यात आले.

यावर समितीने असे मत व्यक्त केले की, पंचायत समितीच्या मासिक बैठका होतात त्यावेळी बऱ्याच वेळा असे लक्षात येते की, खातेप्रमुख व संबंधित अधिकारी गैरहजर राहतात. संबंधित अधिकारी गैरहजर होते त्यांच्यावर नियमानुसार कारवाई करण्यास आपण उशीर केला. यापुढे असे होऊ नये म्हणून ज्या मासिक बैठका होतील त्या बैठकांना खाते प्रमुखांनी वेळेवर उपस्थित रहावे यासाठी विभागाने परिपत्रक काढून तशा सूचना खालच्या स्तरावरील अधिकाऱ्यांना द्याव्यात बैठकीला उपस्थित राहणे बंधनकारक करण्यात येईल काय, पंचायत समिती ही स्थानिक स्वराज्य संस्थेची महत्वाची संस्था आहे. छोटी छोटी कामे येथे होतात. १० पैकी ५ बैठकांना संबंधित अधिकारी गैरहजर आहेत एखाद्या बैठकीला गैरहजर राहिले तर समजू शकतो. पंचायत समितीच्या जनरल बॉडीच्या बैठकीला उत्तरे देण्यासाठी अधिकारी टाळाटाळ करतात. पंचायत समितीची मासिक बैठक होते. असे अधिकारी बैठकीला गैरहजर राहत असतील तर संबंधित यंत्रणा म्हणून मुख्य कार्यकारी अधिकारी व खातेप्रमुखांनी लक्ष देण्याची आवश्यकता असते. या अधिकाऱ्यांना निवृत्ती वेतन सुरू आहे. निवृत्ती वेतनावर नियमानुसार कारवाई करता येते. संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केले तर त्यांच्यावर कारवाई करता येऊ शकते. नुकसान काहीच झाले नाही असे आपण म्हटले तर अधिकाऱ्यांना सोडून द्यावे असे करणे बरोबर नाही. पंचायत समितीच्या बैठकांना अधिकाऱ्यांनी उपस्थित राहणे बंधनकारक आहे. असे केले नाही तर पंचायत समितीचा उद्देश सफल होणार नाही. यांच्या निवृत्ती वेतनाबाबत काही करता येईल ते करावे व वरिष्ठ अधिकाऱ्यांवरदेखील कारवाई करावी.

तद्नंतर समितीने मत व्यक्त करीत निदेश दिले की, भविष्यात अशा चुका होणार नाहीत याबाबत काळजी घेण्याची गरज आहे. बैठकीला हजर राहू शकणार नाही तर संबधित वरिष्ठ अधिकाऱ्यांना दोन तीन दिवसाअगोदर लेखी कळविले पाहिजे असा नियम आहे. जिल्हा परिषदेच्या बैठकीला अधिकारी उपस्थित राहतात परंतु पंचायत समितीच्या बैठकांना अनेक अधिकारी उपस्थित राहत नाहीत. जाणूनबुजून टाळाटाळ करतात असाप्रकार होऊ नये. ग्रामीण भागातील विकासासाठी ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषद या महत्वाच्या संस्था आहेत. उपरोक्त संस्थांच्या बैठकांसाठी अधिकाऱ्यांनी उपस्थित राहणे बंधनकारक करण्याबाबत परिपत्रक काढण्यात येईल काय, यावर अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला सांगितले की, समितीने सूचना दिल्याप्रमाणे आम्ही कॅलेंडर तयार केले आहे. माहे डिसेंबरपासून प्रत्येक पंचायत समितीला कोणत्या अधिकाऱ्यांनी उपस्थित रहावे याबाबत रोस्टर तयार करण्यात आले आहे. त्यामुळे गट विकास अधिकारी व खाते प्रमुख हे बैठकांना उपस्थित राहतील. एखादा खाते प्रमुख बैठकीला जाऊ शकला नाही तर दुसरा खातेप्रमुख बैठकीला जाऊ शकतो. तसेच तालुका स्तरावर तालुका आरोग्य अधिकारी हे बैठकीला उपस्थित राहतात. यावर समितीने पुढील काळात बैठकांना गैरहजर राहू नये असे परिपत्रक काढून सूचना देण्यात याव्यात, असे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना निदेश दिले. यावर अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी याबाबत परिपत्रक काढून सूचना देण्यात येतील. असे समितीला आश्वासित केले.

## अभिप्राय व शिफारशी

पंचायती राज समितीने दिनांक २२ ते २४ नोव्हेंबर, २०१७ या कालावधीत सांगली जिल्हा परिषदेस भेट दिली असता सन २०१२-२०१३ या वर्षाच्या प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान सांगली जिल्हा परिषदेकडून सादर करण्यात आलेल्या माहितीत निदर्शनास आले की, खाते प्रमुखांनी शासनाच्या निकषाप्रमाणे पंचायत समित्यांना भेटी दिलेल्या नाहीत या खातेप्रमुखांवर प्रशासकीय कारवाई करण्याचे समितीने निदेश दिले असतानाही, पंचायत समित्यांना विहित भेट न देणाऱ्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे तत्कालिन कार्यकारी अभियंता व सांगली जिल्हा आरोग्य अधिकारी हे सन २०१८ मध्ये सेवानिवृत्त झाले असल्याच्या कारणास्तव त्यांच्यावर कारवाई करता येत नसल्याने सदर प्रकरण शासनस्तरावर बंद केले आहे.

**वास्तविक खाते प्रमुख पंचायत समित्यांना भेट देत आहेत किंवा नाहीत याबाबतची तपासणी नियमितपणे संबंधित विभाग प्रमुख/मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी करून कर्तव्यात कसूर करण्याऱ्या अधिकाऱ्यांवर सेवानिवृत्त होण्यापूर्वी कारवाई करणे आवश्यक होते. या सर्व प्रकरणातील संबंधितांवर कारवाई करण्यास झालेल्या विलंबावर समिती तिव्र नाराजी व्यक्त करीत आहे.**

जिल्हा परिषदेमार्फत ग्रामीण भागात शासनाच्या कल्याणकारी योजना राबविण्यात येतात. या कल्याणकारी सेवा ग्रामीण भागातील जनतेपर्यंत पोहचविण्याबाबतची जबाबदारी जिल्हा परिषदेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांची आहे. या योजनांच्या कामकाजासाठी खाते प्रमुखांनी पंचायत समितींच्या बैठकींना उपस्थित राहून सदर कामकाज जबाबदारीने पूर्ण करणे अत्यावश्यक आहे. ग्रामीण भागातील विकासासाठी पंचायत समिती महत्वाची संस्था असल्याने गट विकास अधिकारी व खाते प्रमुख पंचायत समित्यांच्या बैठकीस नियमित उपस्थित राहणेबाबतचे परिपत्रक काढण्याचे निदेश समितीने दिले.

**त्यानुसार भविष्यात अनुपस्थितीबाबत कोणतीही तक्रार होणार नाही यासाठी अधिकारी पंचायत समितीच्या बैठकींना बिनचूकपणे उपस्थित राहतील असे परिपत्रक विभागाकडून काढण्यात आले. या परिपत्रकानुसार पंचायत समित्यांना खातेप्रमुख उपस्थित राहत असल्याची व त्यांनी कामकाज केलेल्या कार्यवाहीचा अहवाल मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सादर केल्याबाबतची माहिती तीन महिन्यांच्या आत सादर करण्यात यावी अशी समिती शिफारस करीत आहे.**

प्रकरण दोन

## जिल्हा परिषद, सांगली (प्रशासन)

## ग्रामसेवक व अधिकारी/कर्मचारी मुख्यालयी राहत नसल्याबाबत

## (पंचायत समिती, शिराळा/पलूस)

पंचायती राज समितीने दिनांक २२ ते २४ नोव्हेंबर, २०१७ या कालावधीत सांगली जिल्हा परिषदेस भेट दिली. भेटीच्या वेळी समितीने सन २०१२-२०१३ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान सांगली जिल्ह्यातील पंचायत समिती, शिराळा येथे समितीने भेट देऊन अशी विचारणा केली की, सर्व ग्रामसेवक मुख्यालयी राहतात काय, यावर गट विकास अधिकारी यांनी समितीस विशद केले की, सर्व ग्रामसेवक ८ कि.मी.च्या परिसरामध्ये राहतात. शिराळा हा डोंगरी भाग असल्यामुळे व येथे राहण्याची सोय नाही त्यामुळे ग्रामसेवक मुख्यालयी राहत नाही. पुढे समितीने अशी विचारणा केली की, मग त्यांना घरभाडे भत्ता कसा देण्यात येतो, यावर गट विकास अधिकारी यांनी अशी माहिती दिली की, समितीने वाळवा पंचायत समिती येथील भेटीच्या वेळी असा निदेश दिला होता की, जे कर्मचारी/ अधिकारी मुख्यालयी राहात नाही त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी व त्यांच्याकडून घरभाडे भत्ता वसूल करण्यात यावा व त्याचा अहवाल समितीला सादर करण्यात यावा त्या निदेशाप्रमाणे पंचायत समिती, शिराळा येथेही तीच कारवाई करण्यात येईल.

पुढे समितीने विचारणा केली की, सकाळी लोकांना भेटणे, स्वच्छता अभियान राबविणे यासारखी अनेक कामे ग्रामसेवकांची आहेत. पण प्रत्यक्षात ग्रामसेवक ग्रामपंचायतीमध्ये जात नाही. पंचायत समितीच्या कार्यालयात गेलो होतो, जिल्हा परिषदेमध्ये गेलो होतो अशाप्रकारचे ग्रामसेवकांची कारणे असतात ही गोष्ट खरी आहे काय, यावर गट विकास अधिकारी यांनी समितीस विशद केले की, शिराळा तालुका डोंगरी असल्यामुळे येथे राहण्याची सोय नाही. त्यामुळे ग्रामसेवक येथे राहात नाही. यावर समितीने असे निदर्शनास आणून दिले की, शासन गतिमान न होण्याची मुख्य कारण म्हणजे ग्रामसेवक मुख्यालयी राहात नाही. त्यामुळे शासनाच्या योजना राबविल्या जात नाही.

पंचायत समिती पलूस येथील ग्रामसेवक मुख्यालयी राहतात काय, अशी समितीने विचारणा केली असता गट विकास अधिकारी पंचायत समिती पलूस यांनी समितीस माहिती विशद केली की, सुरूवातीला ग्रामसेवक मुख्यालयी राहात नव्हते. त्यामुळे ग्रामसेवकांवर कारवाई केली. त्यांना घरभाडे भत्ता बंद करण्याच्या नोटीसा दिल्या. यावर समितीने विचारणा केली की, आता पर्यंत आपण किती ग्रामसेवकांचा घरभाडे भत्ता कापलेला आहे यावर गट विकास अधिकारी, पंचायत समिती पलूस यांनी समितीस माहिती दिली की, तीन ग्रामसेवकांचा घरभाडे भत्ता कापलेला आहे. सर्व ग्रामसेवकांनी मुख्यालयी रहावे अशाप्रकारची त्यांना समज दिलेली आहे. ही बाब खरी आहे काय, अशी समितीने विचारणा केली असता गट विकास अधिकारी, यांनी समितीस विशद केले की, सध्याची परिस्थिती सांगितलेली आहे. पुढे त्याअनुषंगाने गट विकास अधिकारी यांनी समितीस माहिती दिली की, सन २०१२-१३ मधील कोणत्याही ग्रामसेवकांवर कारवाई केलेली नाही. त्यांच्याकडे दाखले होते.

तद्नंतर समितीने अशी विचारणा केली की, शासनाच्या गाईड लाईनमध्ये दाखल्याचा उल्लेख केला आहे काय, तद्नंतर समितीने निदेश दिले की, जे ग्रामसेवक मुख्यालयी राहात नाही त्यांच्यावर समितीने निदेश दिल्याप्रमाणे कारवाई करण्यात यावी. ग्रामसेवकांनी मुख्यालयी न राहणे ही गंभीर बाब आहे. सरपंचांच्या संगनमताने दाखले घेण्यात येतात.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

**पंचायत समिती शिराळा/पलूस :—** बहुतांश अधिकारी/ कर्मचारी मुख्यालयी न राहता त्यांना घरभाडे भत्ता वेतनाद्वारे अदा केला जात असल्या प्रकरणी जिल्हा परिषदेने संबंधित अधिकाऱ्याविरूद्ध कोणती कारवाई करण्यात आली आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

**शिराळा :—** सर्व अधिकारी/कर्मचारी हे मुख्यालयी राहत असल्याबाबत त्यांचे दाखले घेण्यात आले आहेत त्याची पडताळणी करून सर्व खाते प्रमुखांनी खात्री केलेली आहे व तसे दाखले दप्तरी दाखल केलेले आहेत. सदर दाखल्यांच्या आधारेच अधिकारी/ कर्मचारी यांना घरभाडे भत्ता वेतनाद्वारे अदा केला जात आहे.

**पलूस :—** सर्व अधिकारी/कर्मचारी हे मुख्यालयी राहत असल्याबाबत त्यांचे दाखले घेण्यात आले आहेत त्याची पडताळणी करून खात्री केलेली आहे व तसे दाखल दप्तरी दाखल केलेल आहेत सदर दाखल्यांच्या आधारेच अधिकारी/कर्मचारी यांना घरभाडे भत्ता वेतनाद्वारे अदा केला जात आहे.

## मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय :—** जिल्हा परिषद, सांगली यांनी नियमानुसार कार्यवाही केली आहे.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने सांगली जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्दयावर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक २७ जानेवारी, २०२१ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी पंचायत समिती, शिराळा याबाबत समितीने विचारणा केली की, पंचायत समिती शिराळा येथील बहुंताश अधिकारी/कर्मचारी मुख्यालयी न राहतात त्यांना घरभाडे भत्ता वेतनाद्वारे अदा केला जात असल्याप्रमाणे जिल्हा परिषदेने संबंधित अधिकाऱ्यांविरुद्ध कोणती कारवाई केली आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत. याबाबत असे उत्तर देण्यात आले आहे की, सर्व अधिकारी व कर्मचारी मुख्यालयी राहत असल्याबाबत त्यांचे दाखले घेण्यात आले आहेत त्याची पडताळणी करून सर्व खातेप्रमुखांनी खात्री केलेली आहे व तसे दाखले दप्तरी दाखल केलेले आहेत. सदर दाखल्यांच्या आधारेच अधिकारी/ कर्मचारी यांना घरभाडे भत्ता वेतनाद्वारे अदा केला जात आहे. उपस्थितीबाबत जे प्रमाणपत्र दाखले घेण्यात येतात ते सरपंच किंवा तलाठी यांच्याकडून घेण्यात येतात. यांचे दाखले घेतले म्हणजे मुख्यालयी राहत आहे असे कोणत्या नियमात नमूद केले आहे. यावर अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विशद केले की, खात्री करण्यासाठी दाखले घेण्यात येतात. शासकीय नियम नाही की, दाखला कोणाकडून घेतला पाहिजे. इतर कामांसाठी सरपंच यांचा दाखला घेण्यात येतो त्याप्रमाणे हे दाखले घेण्यात येतात. या दाखल्यांना कायदेशीर मान्यता नाही. समिती म्हणते ते बरोबर आहे.

समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांना पुढील बाबी निदर्शनास आणून सुचना केल्या की बऱ्याच ठिकाणी आता मुख्यालयी कोणीही राहत नाही. ग्रामसेवक, शिक्षक व इतर महसूल कर्मचारी मुख्यालयी राहत नाहीत. दाखला पाहिजे म्हणून सरपंच किंवा ग्रामसेवक यांचा दाखल जोडण्यात येतो. अनेक वेळा समिती भेट देते तेव्हा मुख्यालयी कोणीही राहत नाही. नियमाप्रमाणे हे कर्मचारी मुख्यालयी राहायला पाहिजेत. शिक्षक, ग्रामसेवक किंवा कोणताच अधिकारी मुख्यालयी राहत नाही ही वस्तुस्थिती आहे. सरपंच किंवा ग्रामसेवक यांच्याकडून दाखला घेणे चुकीचे आहे. जे मुख्यालयी राहत नाहीत त्यांना घरभाडे भत्ता देऊ नका. तसेच दाखले घेतल्याचे त्यांनी लेखी कबूल केले आहे. ज्यावेळी समितीने भेट दिली त्यावेळी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले की, हे कर्मचारी मुख्यालयी राहत नाहीत. यावर अतिरक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी महिला कर्मचाऱ्यांबाबत सूट देऊन पुरूष कर्मचाऱ्यांना राहणे बंधनकारक करता येईल असे मत व्यक्त केले असता समितीने पुढीलप्रमाणे एक उदाहरण दिले की, संभाजीनगर तालुका कन्नड येथील बहिरगांव या गावात ग्रामपंचायतीने शिक्षक, ग्रामसेवक व तलाठी यांच्यासाठी वन बीएचके शासकीय निवासस्थाने तयार केली आहेत. या लोकांनी तेथे राहणे त्यांना बंधनकारक केले आहे. हे लोक मुख्यालयी राहिले नाहीत तर शिक्षक, तलाठी, ग्रामसेवक व आरोग्य विभागाच्या कर्मचाऱ्यांना गावात येऊ दिले जात नाही. त्यामुळे त्या गावात हे सर्व लोक राहतात. शाळा ७.३० वाजता असली तरी अनेक शिक्षक ९ वाजता येतात. बस किंवा रेल्वेच्या वेळापत्रकाप्रमाणे शिक्षक किंवा अधिकारी येतात व रेल्वे बस च्या वेळापत्रका प्रमाणे निघून जातात. अशा प्रकारे दाखले घेणे किंवा देणे चूक आहे असे समितीला वाटते. तसेच राज्यभरात ७० ते ८० टक्के कर्मचारी मुख्यालयी राहत नाहीत अशी परिस्थिती प्रत्येक जिल्ह्यात आहे. इतक्या मोठ्या संख्येने कर्मचारी त्या गावात राहत नसतील तर हा निर्णय शासनाला बदलता येईल तसेच जिल्ह्याच्या किंवा तालुक्याच्या ठिकाणापासून किती किलोमीटर अंतरावर राहिले तर घरभाडे बंद करावा व किती किलोमीटर अंतरावर राहिले की घरभाडे द्यावा याबाबत तोडगा काढता येईल काय, तसेच सरपंच किंवा ग्रामसेवकांनी दिलेले दाखले शासन स्तरावर ग्राह्य धरले जातात काय असे समितीने मत व्यक्त केले यावर अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी असे विशद केले की, याबाबतचा परिच्छेद असल्यामुळे आम्ही अशा प्रकारे पूर्तता केलेली आहे. परंतु याबाबत शासन स्तरावर धोरणात्मक निर्णय होणे आवश्यक आहे.

समितीने पुढीलप्रमाणे सूचना केल्या की, ग्रामसेवक, तलाठी, कृषी सहाय्यक व आरोग्य सेवक हे चार कर्मचारी ग्रामीण भागाशी निगडित आहेत. परंतु हे चारही कर्मचारी मुख्यालयी न राहता ते तालुक्याच्या किंवा जिल्ह्याच्या ठिकाणी राहत असतात. संबंधित गावापासून २५ ते ५० किलोमीटर दूरवर राहतात. हे कर्मचारी गावामध्ये वास्तव्यास राहण्याबाबतचा नियम असताना देखील ते ८-८, १०-१० दिवस संबंधित गावाला भेट देत नाहीत. या चारही कर्मचाऱ्यांकडे ग्रामीण भागातील लोकांचे वारंवार काम असते. त्यामुळे हे कर्मचारी गावामध्येच राहणे बंधनकारक आहे. संबंधित ग्रामपंचायतीने अशा कर्मचाऱ्यांसाठी रोस्टर तयार केले पाहिजे. या सर्व कर्मचाऱ्यांनी संबंधित गावामध्ये किमान सकाळी ११.०० ते सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत गावामध्ये राहणे आवश्यक आहे. ग्रामीण भागातील लोकांना काही अडचण असेल तर ते २० ते २५ किलोमीटरचा प्रवास करून तालुक्याच्या ठिकाणी येतात. परंतु हे कर्मचारी तेथे देखील सापडत नाहीत. या कर्मचाऱ्यांना नोकरीच्या गावामध्ये वास्तव्यास राहणे बंधनकारक करण्यात यावे. तसेच जे कर्मचारी गावामध्ये राहत नसतील किंवा कोणी तशी त्यांचेविरुद्ध तक्रार केली तर संबंधित कर्मचाऱ्यावर योग्य ती कारवाई करण्याची तरतूद असणे आवश्यक आहे. यावर अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस पुढीलप्रमाणे खुलासा केला की, समितीच्या सूचनेप्रमाणे जिल्हा परिषद सांगली यांनी एक परिपत्रक निर्गमित केलेले आहे. सांगली जिल्ह्यामध्ये प्रत्येक ग्रामपंचायत, शाळा, जनावरांचा दवाखाना व प्राथमिक आरोग्य केंद्र या सर्व कार्यालयामध्ये गट विकास अधिकारी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, अतिरिक्त मुख्य

कार्यकारी अधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी या सर्व अधिकाऱ्यांचे दूरध्वनी क्रमांक फलकावर लावलेले आहेत. त्यामुळे जिल्ह्यातील कोणाचीही काही तक्रार असेल तर ते तत्काळ वरील कोणत्याही अधिकाऱ्यांना दूरध्वनी करु शकतात. सांगली जिल्हा परिषदेतील सर्व कर्मचारी वेळेवर कार्यालयामध्ये उपस्थित राहतात.

तद्नंतर समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांना पुढीलप्रमाणे असे निदर्शनास आणून दिले की, काही गावामध्ये या कर्मचाऱ्यांसाठी निवासस्थानाची व्यवस्था केलेली आहे. ग्रामीण भागामध्ये अशा कर्मचाऱ्यांना राहण्याची व्यवस्था नाही किंवा तशा प्रकारची व्यवस्था करून दिली जात नाही. त्यामुळे कार्यालयीन वेळेमध्ये संबंधित सर्व कर्मचारी गावामध्ये उपस्थित असणे आवश्यक आहे. जिल्ह्यातील संबंधित कर्मचाऱ्यांना नेमून दिलेल्या गावामध्ये कार्यालयीन वेळेच्या आत उपस्थित राहणे सक्तीचे करणार आहात काय जर एखादा कर्मचारी संबंधित गावामध्ये उपस्थित राहिला नाही तर त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे. या कर्मचाऱ्यांना देखील बायोमेट्रीक बंधनकारक करता येईल काय, याबाबत राज्य स्तरावर विचार केला पाहिजे. यावर अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विशद केले की सांगली जिल्ह्यामध्ये कोठेही काही अडचण असेल किंवा काही तक्रार असेल तर ते थेट संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्क करतात. काही कामाविषयी तक्रार असेल तर त्या कामाचा फोटो काढून थेट अधिकाऱ्यांना पाठवितात. गावामध्येच वास्तव्यास असल्याबाबतचे प्रमाणपत्र सरपंच किंवा ग्रामसेवक यांच्याकडून घेऊन ते सादर करतात. त्या आधारेच त्यांना घरभाडे देखील दिले जाते. समितीने अशी विचारणा केली की, अशा प्रकारचे प्रमाणपत्र देऊ शकतात काय यावर अपर मुख्य सचिव ग्रामविकास विभाग यांनी समितीस पुढीलप्रमाणे खुलासा केला की, अशी कोठेही तरतूद करण्यात आली नाही. सध्या स्वंयघोषित प्रमाणपत्राची व्यवस्था केलेली आहे. त्यामुळे घरभाडे देताना त्या प्रमाणपत्रावर विश्वास ठेवून पुढील कार्यवाही केली जाते. परंतु या कर्मचाऱ्यांनी यापलिकडे जाऊन सरपंचाचे प्रमाणपत्र घेतले आहे. अशा कर्मचाऱ्यांनी मुख्यालयी राहणे हे बंधनकारक केले आहे. जर कर्मचारी मुख्यालयी राहत नसतील तर त्यांना घरभाडे देण्यात येऊ नये, असा नियम देखील आहे. जर एखादा कर्मचारी गावामध्ये येतच नसेल तर त्या कर्मचाऱ्यांना वेतन देऊ नये, असाही नियम आहे. समितीने सांगितल्याप्रमाणे सदर कर्मचारी गावामध्ये वास्तव्यास राहत नाहीत, ही खरी वस्तूस्थिती आहे. हे कर्मचारी गावामध्ये वास्तव्यास न राहण्याचे अनेक कारणे आहेत. राज्यामध्ये मोठ्या प्रमाणावर पदे रिक्त आहेत. एका कर्मचाऱ्याकडे दोन ते तीन गांवाचा अतिरिक्त कार्यभार दिलेला आहे. त्यामुळे या बाबीचा आधार घेऊन ते गावामध्ये राहणे टाळतात. आठवड्यातून तीन दिवस तरी संबंधित कर्मचाऱ्यांनी मुख्यालयी राहणे आवश्यक आहे. तसे आदेश देखील निर्गमित करण्यात येतील. समितीने सांगितल्या प्रमाणे औरंगाबाद जिल्ह्यातील एका गावामध्ये अशा कर्मचाऱ्यांना राहण्याची व्यवस्था केली आहे. केंद्र शासनाचा काम करणाऱ्या महिला वसतीगृहाची (वर्किंग वुमन हॉस्टेलचा) एक योजना (कन्सेप्ट) आहे. त्याप्रमाणे आदिवासी विभागामध्ये काम करणाऱ्या किमान महिला कर्मचाऱ्यांसाठी तालुका स्तरावर अशा प्रकारच्या हॉस्टेलची व्यवस्था केली तर अधिक सोयीचे होईल, असे आम्ही सूचविलेले होते. आम्ही या सर्व बाबींची नोंद घेतलेली आहे. यामध्ये सुधारणा कशी करता येईल, याबाबतचे एक नवीन परिपत्रक निश्चितपणे निर्गमित करण्यात येईल.

तद्नंतर समितीने अपर मुख्य सचिवांना अशी विचारणा केली की, विभाग प्रमुख यांनी महिन्यातून किंवा पंधरा दिवसांतून एक दिवस तरी ग्रामीण भागामध्ये राहण्याबाबत शासनाचा निर्णय आहे काय, यावर अपर मुख्य सचिवांनी समितीस सांगितले की, जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी अशा सर्व अधिकाऱ्यांनी ग्रामीण भागामध्ये एक दिवस तरी मुक्कामी थांबावे, असा शासन निर्णय आहे. यावर समितीने असा प्रश्न विचारला की या निर्णयाची अंमलबजावणी होत नाही. यावर अपर मुख्य सचिवांनी समितीस सांगितले या निर्णयांची अंमलबजावणी होते. संबंधित अधिकारी हे चांगल्या रेस्टहाऊसमध्ये एक रात्र राहून पुन्हा मुख्यालयी येतात. तदनंतर समितीने पुढीलप्रमाणे सुचना दिली की, शहरी भागामध्ये नसून ग्रामीण भागामध्ये मुक्कामी थांबण्याबाबतचा शासन निर्णय आहे काय जिल्ह्यातील वरिष्ठ अधिकारी ग्रामीण भागामध्ये मुक्कामी राहिले तर तेथील लोकांच्या अडचणी दूर होण्यास मदत होते. ग्रामीण भागामध्ये काही अडचणी असतील तर शासनापर्यंत पोहोचू शकतात. त्यामुळे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी ग्रामीण भागाचा दौरा केला पाहिजे. समिती नेहमी ग्रामीण भागांना भेटी देते. गावातील लोक समितीला अनेक अडचणी सांगतात. परंतु या अडचणी वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या लक्षात येत नाहीत तोपर्यंत त्या दूर होऊ शकत नाहीत. ग्रामीण भागातील अडचणी नेहमी लोकप्रतिनिधी सभागृहामध्ये मांडतात. परंतु त्यावर शासन कोणतीही कार्यवाही करीत नाही. ग्रामीण भागातील अडचणी दूर करण्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी पुढाकार घेणे गरजेचे आहे. ग्रामसेवक, तलाठी, कृषी अधिकारी व ऊर्जा विभागाचे अधिकारी यांनी ग्रामीण भागामध्ये वास्तव्यास राहणे आवश्यकच आहे. अशा कर्मचाऱ्यांच्या नियुक्ती आदेशामध्ये ग्रामीण भागामध्ये वास्तव्यास राहण्याबाबतचा कोठेही उल्लेख करण्यात येत नाही. ग्रामीण भागामध्ये नोकरी करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या नियुक्ती आदेशामध्ये तशा प्रकारचा उल्लेख करणे आवश्यक आहे. असा उल्लेख केला तर नोकरी करणाऱ्या कर्मचाऱ्याच्या लक्षात राहील की, ते मुख्यालयी वास्तव्यास राहतील असे लिहून दिलेले आहे. असा उल्लेख कोणत्याही नियुक्ती आदेशामध्ये नसेल असे समितीला वाटते. तसेच नियुक्ती आदेशामध्ये असा उल्लेख असेल तर त्या प्रमाणे शासन कार्यवाही का करीत नाही खाते प्रमुखांनी पंचायत समितीला भेटी दिल्या नाही म्हणून आपण संबंधित अधिकाऱ्यावर कारवाई करीत आहात. जर नियुक्ती आदेशामध्ये तसा उल्लेख केला असेल तर आतापर्यंत राज्यातील किती कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यात आली आहे उक्त कर्मचाऱ्यांनी मुख्यालयी राहणे आवश्यक आहे, असा शासनाचा निर्णय असताना देखील ते मुख्यालयी राहत नाहीत. नियुक्ती आदेशामध्ये वास्तव्यास राहण्याबाबतचा कोणताही

उल्लेख करण्यात येत नाही. सचिव महोदयांनी देखील याबाबतची खात्री करून तसे समितीला कळवावे. जर नियुक्ती आदेशामध्ये असा उल्लेख पूर्वी करीत नसतील तर यापुढे होणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या नियुक्ती आदेशामध्ये तसा उल्लेख करण्यात यावा, अशी समितीने सूचना दिली.

तद्नंतर समितीने असेही निदर्शनास आणून दिले की, एका ग्रामसेवकाला किंवा तलाठी यांना दोन ते तीन गावांचा अतिरिक्त कार्यभार देण्यात आला असल्यामुळे ते एकाच गावामध्ये वास्तव्यास राहू शकत नाहीत. परंतु शिक्षकांना असा कोणताही अतिरिक्त कार्यभार देण्यात आला नाही. आपण वेळोवेळी जिल्हा परिषद शाळेतील शिक्षणाच्या दर्जाबाबत चर्चा करतो. याचे कारण ग्रामीण भागातील शिक्षक वेळेवर शाळेमध्ये जात नाहीत. महाराष्ट्र हे पुढारलेले राज्य आहे. फुले, शाहू, आंबेडकरांचा हा महाराष्ट्र आहे. जिल्हा परिषद शाळेतील शिक्षणाच्या दर्जाबाबत आपले राज्य खूप मागे आहे. हा विषय सांगली जिल्ह्यापुरता मर्यादित नसून तो पूर्ण राज्याचा विषय आहे. राज्यातील कोणत्याही शिक्षकाला एकाच वेळी दोन शाळांचा कार्यभार दिलेला नाही. सर्व शिक्षकांना फक्त एकाच शाळेचा कार्यभार आहे. तीन वर्षे शिक्षकांच्या बदल्या होत नाहीत. राज्यातील सर्व जिल्हा परिषद शाळेतील सर्व शिक्षकांना नोकरीच्या गावी वास्तव्यास राहणे बंधनकारक केलेच पाहिजे. राज्यातील अनेक शिक्षक हे शाळेमध्ये कमी पण पंचायत समिती किंवा जिल्हा परिषद कार्यालयामध्ये जास्त आहेत. तलाठी, ग्रामसेवक, कृषी सहाय्यक यांना अतिरिक्त कार्यभार असल्यामुळे त्यांना संबंधित गावामध्ये वास्तव्यास राहण्याबाबत बंधनकारक करु शकत नसलो तरी शिक्षकांना मात्र बंधनकारक करता येईल. वरील सर्व कर्मचाऱ्यांना गावामध्ये राहणे बंधनकारक करण्यात यावे. जे कर्मचारी मुख्यालयी वास्तव्यास राहत नाही, अशा कर्मचाऱ्यांचे घरभाडे देण्यात येऊ नये. तसेच जेव्हा घरभाडे देण्याबाबतचा निर्णय घेतला होता, तेव्हा कर्मचाऱ्यांना अतिशय कमी वेतन दिले जात होते. त्यामुळे त्यांना घरभाडे देण्याची तरतूद करण्यात आली होती. आता वेतनामध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ झाली असल्यामुळे आता घरभाडे देण्याची आवश्यकता आहे असे वाटत नाही. आताचे कर्मचारी हे चार चाकी वाहनाने ५० किलोमीटरचा प्रवास करून नोकरीच्या ठिकाणी जात आहेत. असे असताना अशा कर्मचाऱ्यांना अतिरिक्त घरभाडे का द्यायचे, हा देखील प्रश्न आहे. कोणत्याही कर्मचाऱ्यांना मुख्यालयी वास्तव्यास राहण्याबाबत सांगितल्यानंतर ते घरगुती अडचण सांगून हे कर्मचारी पूर्ण गावाला वेठीस धरत असतात. अनेक कर्मचाऱ्यांना अतिरिक्त कार्यभार असला तरी त्यांनी मुख्य गावामध्ये कोणत्या दिवशी थांबायचे व अन्य गावांमध्ये केव्हा थांबायचे, याबाबतचे नियोजन करणे आवश्यक आहे. तलाठी किंवा ग्रामसेवकांच्या तालुका स्तरावरील बैठका महिन्यातील एका विशिष्ट तारखेला घेण्याबाबतचे नियोजन करता येईल काय यावर अपर मुख्य सचिव ग्रामविकास विभाग यांनी समितीला उत्तर दिले की. होय, याबाबतचे नियोजन करता येईल. राज्यातील प्रत्येक जिल्हा परिषदेला पुढील महिन्यातील सर्व बैठकांचे नियोजन करून ते सर्व कार्यालयामध्ये प्रसिद्ध करता येईल. यावर समितीने पुढीलप्रमाणे मत व्यक्त केले की, ग्रामसेवक किंवा तलाठ्यांकडे काम असल्यामुळे गावातील लोक काम सोडून तालुक्याच्या ठिकाणी जातात. परंतु तेथे जाऊन देखील संबंधित कर्मचाऱ्यांची भेट होत नाही. त्यामुळे या कर्मचाऱ्यांची तालुक्याच्या ठिकाणी केव्हा व किती वाजता बैठक आहे, याबाबतचे नियोजन केले तर संबंधित गावातील लोकांना ग्रामसभेच्या माध्यमातून तशी माहिती देता येईल. कोणते अधिकारी कोणत्याही दिवशी गावामध्ये उपस्थित राहणार आहेत, याबाबतची माहिती ग्रामपंचायतीमध्ये दर्शनी भागावर फलकावर नोंद करून गावातील लोकांना देणे बंधनकारक करण्यात यावी. यावर अपर मुख्य सचिव यांनी होकारात्मक प्रतिक्रीया देत सांगितले की, ठीक आहे. अशी व्यवस्था करण्यात येईल.

तद्नंतर समितीने अपर मुख्य सचिव यांना पुढीलप्रमाणे सूचना केल्या की, भविष्यामध्ये ग्रामपंचायत स्तरावर बायोमेट्रीकची व्यवस्था करण्यात येईल काय, राज्यातील सर्व जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या मुख्यालयामध्ये बायोमेट्रीकची व्यवस्था केलेली आहे. परंतु यातील अनेक कार्यालयातील बायोमेट्रीक मशीन बंद आहेत. सदर मशीन मुद्दाम बंद केले आहेत की, काही तांत्रिक कारणामुळे बंद आहेत, याबाबतची माहिती घेणे आवश्यक आहे. तलाठी, ग्रामसेवक, शिक्षक व कृषी सहाय्यक यांनी मुख्यालयी वास्तव्यास राहण्यासंबधी शासनाने निर्णय घेतला आहे. तरी देखील यातील कोणतेही कर्मचारी मुख्यालयी वास्तव्यास राहत नाहीत. यातील काही कर्मचाऱ्यांना अतिरिक्त कार्यभार असल्यामुळे ते मुख्यालयी राहू शकत नसतील तर त्यांनी आठवड्यातील काही विशिष्ट दिवशी मुख्यालयी वास्तव्यास राहणे बंधनकारक करण्यात यावे. तसेच ज्या कर्मचाऱ्यांना अतिरिक्त कार्यभार देण्यात आला नाही, असे कर्मचारी मुख्यालयी राहत नसतील तर त्यांच्यावर आवश्यक कार्यवाही करण्यात यावी, अशी समितीची सूचना आहे. समितीने वरील केलेल्या सुचनांबाबत आवश्यक कार्यवाही करण्यात येईल. असे अपर मुख्य सचिव यांनी समितीला आश्वासन दिले.

## अभिप्राय व शिफारशी

सन २०१२-१३ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या चर्चेच्या अनुषंगाने समितीने सांगली जिल्हा परिषेदस भेट दिली असता समितीच्या असे निर्दशनास आले की, पंचायत समिती, शिराळा येथील बहुंताश अधिकारी/कर्मचारी मुख्यालयी न राहता त्यांना घरभाडे भत्ता वेतनाद्वारे अदा केला जात आहे. सर्व अधिकारी व कर्मचारी मुख्यालयी राहत असल्याबाबतचे दाखले सरपंच, तलाठी किंवा ग्रामसेवक यांच्याकडून घेण्यात आले आहेत त्याची पडताळणी करून सर्व खातेप्रमुखांनी खात्री केलेली आहे व तसे दाखले दप्तरी दाखल केलेले आहेत. सदर दाखल्यांच्या आधारेच अधिकारी/ कर्मचारी यांना घरभाडे भत्ता वेतनाद्वारे अदा केला जात असल्याची माहिती जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेली आहे.

हा प्रश्न केवळ सांगली जिल्ह्यापुरता नसून राज्यातील संपूर्ण जिल्हा परिषदांमधील आहे. **साधारणतः राज्यभरात ७० ते ८० टक्के कर्मचारी मुख्यालयी राहत नाहीत. जिल्ह्याच्या किंवा तालुक्याच्या ठिकाणापासून किती किलोमीटर अंतरावर राहिले तर घरभाडे बंद करावे व किती किलोमीटर अंतरावर राहिले की घरभाडे द्यावे. यासाठी शासन निर्णयात निश्चित अशी तरतुद केलेली नाही. अलिकडे दळणवळणाच्या सुखसोयी चांगल्या प्रकारे उपलब्ध आहेत म्हणून अनेक कर्मचारी कामाच्या ठिकाणी त्यांच्या स्वतःच्या वाहनाने ये-जा करतात. काही गावांत कर्मचाऱ्यांसाठी राहण्यासाठी भाड्याने योग्य ती निवासस्थाने मिळत नाहीत हे त्या मागचे एक कारण असून दुसरे कारण अनेक कर्मचाऱ्यांची पाल्ये शिक्षणासाठी तालुक्याच्या ठिकाणी किंवा शहराच्या ठिकाणी राहतात त्यामुळे असे कर्मचारी मुख्यालयी येता जाताना वाहनाचा वापर करतात अशा कर्मचाऱ्यांचा शासन निर्णयात विचार करताना त्यांना नेमके अंतर नेमून देणे आवश्यक आहे. जेणेकरुन उपरोक्त नमूद केलेल्या कारणास्तव कर्मचाऱ्यांना त्याचा लाभ मिळू शकेल. सबब, शासनाने अशा प्रकरणी निश्चित किलोमीटर किती असावे याबाबत सर्वंकष आढावा घेऊन निश्चित धोरण आखावे व त्यानुसार शासन निर्णय निर्गमित करावा. याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्याच्या आत सादर करावी अशी समितीची शिफारस आहे.**

राज्यामध्ये मोठ्या प्रमाणावर पदे रिक्त आहेत. तलाठी, ग्रामसेवक, शिक्षक व कृषी सहाय्यक यांनी मुख्यालयी वास्तव्यास राहण्यासंबधी शासनाने निर्णय घेतला आहे. यातील काही कर्मचाऱ्यांना अतिरिक्त कार्यभार असल्यामुळे ते मुख्यालयी राहू शकत नसतील तर राज्यातील प्रत्येक जिल्हा परिषदेला पुढील महिन्यातील सर्व बैठकांचे नियोजन करून ते सर्व कार्यालयामध्ये प्रसिद्ध करता येईल. त्यांनी **मुख्य गावामध्ये कोणत्या दिवशी थांबायचे व अन्य गावांमध्ये केव्हा थांबायचे, याबाबतचे नियोजन करणे आवश्यक आहे. तलाठी किंवा ग्रामसेवकांच्या तालुका स्तरावरील बैठका महिन्यातील एका विशिष्ट तारखेला घेण्याबाबतचे नियोजन केले तर कोणते अधिकारी कोणत्या दिवशी मुख्यालयाच्या गावामध्ये उपस्थित राहणार आहेत, याबाबतची माहिती ग्रामसभेच्या माध्यमातून गावातील लोकांना देणे बंधनकारक करण्यात यावी. त्याचप्रमाणे कर्मचाऱ्यांच्या कामांच्या तासांचे वेळापत्रक ग्रामपंचायत कार्यालयात दर्शनी भागाच्या फलकावर नोंद करून त्यांच्या ड्युटीचे विवरण संबंधित गावकऱ्यांना उपलब्ध करून देण्यात यावे. याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यात सादर करण्यात यावी, अशी समिती शिफारस करीत आहे.**

ग्रामीण भागामध्ये अशा कर्मचाऱ्यांना राहण्याची व्यवस्था नाही किंवा तशा प्रकारची व्यवस्था करून दिली जात नाही. **जिल्ह्यातील संबंधित कर्मचाऱ्यांना नेमून दिलेल्या गावामध्ये कार्यालयीन वेळेच्या आत उपस्थित राहणे सक्तीचे करून या कर्मचाऱ्यांना देखील बायोमेट्रीक बंधनकारक करण्यात यावे, याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला दोन महिन्यात सादर करण्यात यावी, अशी समिती शिफारस करीत आहे.**

केंद्र शासनाचा काम करणाऱ्या महिला वसतीगृहाची (वर्किंग वुमन हॉस्टेलचा) एक योजना (कन्सेप्ट) आहे. **त्याप्रमाणे आदिवासी विभागामध्ये काम करणाऱ्या किमान महिला कर्मचाऱ्यांसाठी मोठ्या लोकसंख्येच्या गावांमध्ये किंवा जिल्हा परिषदेच्या प्रत्येक गणात वसतीगृहांची अथवा शासकीय निवासस्थानांची निर्मिती करण्याबाबत योग्य ती उपाययोजना करण्याबाबत धोरण आखून त्यास मंजूरी देण्याबाबत शासनाने निर्णय घ्यावा व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला दोन महिन्यात सादर करण्यात यावी, अशी समिती शिफारस करीत आहे.**

**राज्यातील ग्रामसेवक, तलाठी, कृषी अधिकारी व ऊर्जा विभागाचे अधिकारी व इतरही अनेक कर्मचारी ज्यांचा ग्रामीण भागातील जनतेला सुखसोयी देण्याच्या कामी नियुक्ती करण्यात येते. मुख्यालयी राहण्याची सोय नाही अशी सबब सांगून अनेक कर्मचारी मुख्यालयी राहत नाहीत तेव्हा शासनाने प्रत्येक ग्रामीण भागातील शासकीय कर्मचाऱ्यास नियुक्ती देताना अशा नियुक्ती आदेशामध्ये ग्रामीण भागात वास्तव्यास राहण्याची अट घालून त्यास मुख्यालयी राहण्याचे बंधन घालता येईल किंवा कसे याबाबत आढावा घेऊन सर्वंकष शासन निर्णय निर्गमित करावा व त्याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला तीन महिन्याच्या आत सादर करण्यात यावा, अशी समितीची शिफारस आहे.**

प्रकरण तीन

## जिल्हा परिषद, सांगली (प्रशासन)

### बनावट स्वाक्षरी करून केलेला अपहार (पंचायत समिती, मिरज)

पंचायती राज समितीने दिनांक २२ ते २४ नोव्हेंबर, २०१७ या कालावधीत सांगली जिल्हा परिषदेस भेट दिली असता सन २०१२-१३ या वर्षाच्या प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान सांगली जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने अशी विचारणा केली की, श्री. दरगावकर, क.सहा., एकात्मिक बालविकास विभाग यांना दिनाक १३ फेब्रुवारी २०१२ रोजी निलंबित केले असून दिनांक १६ मे २०१५ रोजी शासकीय सेवेतून बडतर्फ करण्यात आल्याचे म्हटलेले आहे. त्यांनी किती रुपयांचा अपहार केला त्याची रक्कम माहिती पुस्तिकेत का दिलेली नाही. यावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, सन २०१२-२०१३ मधील प्रकरण आहे. दिनांक १३ फेब्रुवारी २०१२ रोजी त्यांना निलंबित केलेले आहे. दिनांक १६ मे २०१५ रोजी शासकीय सेवेतून बडतर्फ केलेले आहे. या प्रकरणामध्ये एकूण अपहारित रक्कम ३७ लाख १७ हजार १३९ होती. त्यापैकी २६ लाख ९० हजार इतकी रक्कम जमा झालेली आहे. एकूण अपहारित रक्कम १० लाख २६ हजार रुपये असून तेवढी रक्कम त्यांच्याकडून वसूल केलेली आहे. त्या संदर्भातील चलन उपलब्ध आहे. यावर आपण ही माहिती पुस्तिकेमध्ये का दिली नाही. असा समितीने प्रश्न केला असता प्रश्नावलीमध्ये रकमेचा उल्लेख नव्हता म्हणून माहिती दिलेली नाही. यावर श्री. दरगांवकर यांच्यावर गुन्हा दाखल केला होता काय, अशी समितीने विचारणा केली असता त्यांना सेवेतून बडतर्फ केलेले आहे. असे उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी उत्तर दिले. यावर समितीने विचारणा केली की, समितीने माहिती विचारल्यानंतर आपण अपहाराची रक्कम सांगितली. एकूण १० लाख रुपयांचा अपहार केल्याचे उघडकीस आले. आपणाकडे ही सर्व माहिती उपलब्ध असताना ती लेखी स्वरुपात का दिली नाही. तसेच मालगाव येथील प्रकरण काय आहे. यावर तत्कालीन विस्तार अधिकारी यांनी समितीस पुढीलप्रमाणे विशद केले की, श्री. शिंदे, ग्रामसेवक यांनी लेखापरीक्षणास कागदपत्रे उपलब्ध करून दिली नाहीत. यशवंत ग्राम समृद्धी योजनेच्या कामाची मोजमाप पुस्तिका उपलब्ध करून दिली नाही. कोटेशन्स पहावयास मिळाली नाहीत. नमुना ७ च्या पावत्या घेतल्या नाहीत. कामासाठी ग्रामपंचायत स्तरावर निधी उपलब्ध झाला होता. लेखापरीक्षणास कागदपत्रे उपलब्ध झाली नाहीत हा आक्षेप आहे.

तद्नंतर समितीने विचारणा केली की, लेखापरीक्षणास कागदपत्रे उपलब्ध करून देण्यासाठी तीन वेळा संधी देण्यात येते. लेखापरीक्षणास कागदपत्रे सादर केली नाहीत हा आक्षेप आहे. ७ नमुना नाही. सदर काम पूर्ण झालेले आहे. परंतु आपणास ऑडीटसमोर चांगल्याप्रकारे बाजू मांडण्यात आली नसल्यामुळे सदर कामामध्ये गैरव्यवहार झाल्याचे दिसून येत आहे असे समजते. आपल्या चुकीमुळे आपलाच अधिकारी अडचणीत आला. यावर तत्कालिन अधिकारी यांनी समितीस विशद केले की, या प्रकरणी १० लाख ४० हजार रुपयांचा अपहार झालेला आहे. संबंधित लिपिकाने खोट्या सह्या करून पैसे काढले. त्याला बडतर्फ केलेले आहे. त्याने चेक चोरले होते, त्याशिवाय तो कॅशबुक लिहित नव्हता. त्याने हे सर्व नियोजन करून केलेले आहे. यावर समितीने विचारणा केली की, आपण सांगितले की, लिपिकाने खोट्या सह्या केल्या. परंतु चेक चोरले असतील तर चेकच्या नंबरवरून ते कळते. आपण वेळेवर रिकन्सीलिएशन केले असते तर या गोष्टी वेळीच लक्षात आल्या असत्या. यावर मुख्य लेखा वित्त अधिकारी यांनी समितीस पुढीलप्रमाणे माहिती दिली की, तालुका स्तरावर बालविकास प्रकल्पासाठी बालविकास अधिकारी हे डीडीओ असतात. या सर्व गोष्टी पाहणे त्यांची जबाबदारी होती. रिकन्सीलिएशन त्यांच्या स्तरावर होते. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या गोष्टी तपासून घ्यावयास पाहिजे होत्या. परंतु तसे झालेले दिसत नाही. यावर समितीने या प्रकरणी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात येईल, असे निदेश दिले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

**पंचायत समिती मिरज :—** लेखा परीक्षणास कागदपत्रे उपलब्ध करून न देणे, नमुना ७ नसणे या प्रकरणांमध्ये रूपये १० लाख ४० हजार रूपयाचा अपहार झालेला असून संबंधित लिपिकाने खोट्या सह्या करून पैसे काढल्यामुळे त्याला बडतर्फ करण्यात आलेले आहे, तालुका स्तरावर बालविकास प्रकल्पासाठी बालविकास अधिकारी हे आहरण व संवितरण अधिकारी (डीडीओ) असतात याप्रकरणी सखोल चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार याप्रकरणी संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून कोणती कारवाई करण्यात आली आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

तालुकास्तरावर बालविकास प्रकल्प अधिकारी हे आहरण व संवितरण अधिकारी असल्यामुळे याप्रकरणी कार्यालय प्रमुख म्हणून ते जबाबदार आहेत किंवा कसे यासंदर्भात कागदपत्रांची छाननी करून चौकशी केली असता, याप्रकरणी बडतर्फ करण्यात आलेले श्री. विशाल हुन्नापा दरगावकर, कनिष्ठ सहायक यांनी खोट्या सह्या करून बालविकास प्रकल्प अधिकारी यांना अनभिज्ञ ठेऊन रूपये १० लाख ४० हजार रूपयाचा अपहार केल्याचे आढळून येते. त्यामुळे तत्कालिन बालविकास अधिकारी यांचेवर कारवाई करण्यात आली नाही. अपहाराची १० लाख ४० हजार रक्कम श्री. विशाल हुन्नापा दरगावकर, कनिष्ठ सहायक यांचे कडून हप्त्या हप्त्याने डिसेंबर २०११ ते जुलै २०१२ या कालावधीत वसूल केली आहे.

## मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय :— (वित्त-९)** जिल्हा परिषदेने केलेल्या कार्यवाहीशी सहमत आहे.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने सांगली जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक २७ जानेवारी, २०२१ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध करून न देणे, नमुना ७ नसणे या प्रकरणांमध्ये रुपये १० लाख ४० हजार रुपयांचा अपहार झाल्याप्रकरणी संबंधित कर्मचाऱ्यावर क्रिमिनल ॲक्शन का घेण्यात आली नाही, असा प्रश्न समितीने केला असता अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विशद केले की, जेव्हा ही बाब लक्षात आली तेव्हा अशा प्रकारची कार्यवाही करणे अपेक्षित होते. सदर प्रकरणाचा चौकशी अहवाल प्राप्त झाल्यानंतर संबंधित कर्मचाऱ्यावर बडतर्फीची कारवाई करण्यात आली आहे. यावर समितीने पुढीलप्रमाणे विचारणा केली की, समितीचा प्रश्न असा आहे की, संबंधित कर्मचाऱ्यावर क्रिमिनल ॲक्शन का घेण्यात आली नाही आणि सदर प्रकरणाला कोण जबाबदार आहे. एखाद्या माणसाने चोरी केली व ती लक्षात आल्यानंतर चोरलेला माल परत केल्यानंतर तो लगेच निर्दोष सुटतो काय. संबंधित कर्मचाऱ्यावर क्रिमिनल ॲक्शन का घेण्यात आली नाही, याला जाबाबदार कोण आहे. अशा प्रकारचा अपहार करणाऱ्या कर्मचाऱ्यांना मदत करणे चुकीचे आहे. उक्त प्रकरणी क्रिमिनल ॲक्शन झाली तर अन्य कर्मचाऱ्यांमध्ये देखील भिती निर्माण होऊन असे धाडस कोणीही करणार नाही. यावर अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, संबंधित कर्मचाऱ्यांकडून अपहार केलेली रक्कम वसूल करण्यात आली आहे. सदर कर्मचाऱ्यावर आता क्रिमिनल ॲक्शन घेता येते काय, ही बाब तपासून त्यांच्यावर निश्चितपणे क्रिमिनल ॲक्शन घेण्यात येईल. क्रिमिनल ॲक्शन घेण्यासाठी कोणतीही कालमर्यादा नाही. त्यामुळे आता सदर प्रकरणी क्रिमिनल ॲक्शन घेता येईल काय, हे तपासून त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, संबंधित कर्मचाऱ्यावर क्रिमिनल ॲक्शन घेण्यासाठी एवढा विलंब होण्याची कारणे काय आहेत. सदर विषय समिती समोर आल्यामुळे चौकशी करून त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल, असे सांगत आहात. सदर प्रकरण हे १० वर्षापूर्वीचे आहे. संबंधित अधिकारी आता चौकशी करून आवश्यक कारवाई करण्यात येईल, असे उत्तर देत आहेत. भ्रष्टाचार करणाऱ्या कर्मचाऱ्यावर १०-१० वर्षे कारवाई केली जात नाही, ही गंभीर बाब आहे. या कर्मचाऱ्याला शिक्षा झालीच पाहिजे, अशी समितीची सूचना आहे. सदरहू विषय सन २०१२-१३ या वर्षातील आहे. असे असताना सन २०१७ रोजी पंचायती राज समितीने भेट दिल्यानंतर सदरहू विषय निदर्शनास आला आहे. माहे जुलै, २०१२ मध्ये पैसे काढण्यात आले आहेत. पंचायती राज समितीच्या दौऱ्यावेळी हा विषय समितीच्या निदर्शनास आला होता. त्याच वेळेस संबंधित अधिकाऱ्यांनी फौजदारी कारवाई करावयास हवी होती. परंतु आता विभागाच्या अधिकाऱ्यांचे म्हणणे असे आहे, की सदरहू बाब पडताळून गुन्हा दाखल करावयाचा किंवा नाही, हे ठरविले जाईल व त्यानुसार कारवाई केली जाईल.

यावर अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे खुलासा केला की, सदरहू प्रकरणामध्ये महिला व बालविकास अधिकारी यांनी चौकशी केली होती. त्यावेळेस खोट्या सह्या केल्याचे दिसून आले होते. यात त्रयस्थ व्यक्तीने तक्रार केली नाही. विभागाच्या अधिकाऱ्यांनी चौकशी दरम्यान ही बाब निदर्शनास आणून दिली आहे. तसेच या प्रकरणी वसुलीही सुरू करण्यात आली होती. मध्यंतरी विभागीय चौकशीचा निकाल येईपर्यंत विलंब झाला होता. विभागीय चौकशी अहवालात बडतर्फ करण्याचे नमूद करण्यात आले होते. या विषयातील गैरप्रकार महिला व बालविकास अधिकारी यांनीच निदर्शनास आणून दिला आहे. यावर समितीने विचारणा केली की, महिला व बालविकास अधिकारी यांच्या निदर्शनास ही बाब आल्यानंतर त्यांनी फिर्याद न देण्याचे कारण काय आहे. यावर अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला विदित केले की, या प्रकरणात आवश्यकता असेल तर एफआयआर दाखल करण्यात येईल. तदनंतर समितीने पुढीलप्रमाणे निदेश दिले की, ज्याअर्थी पैसे भरलेले आहेत, त्याअर्थी हा गुन्हा कबूल करण्यात आला आहे. यात चौकशी करण्याची आवश्यकता नाही. तसेच पैसे भरले म्हणजेच गुन्हा माफ होतो, असे नाही. पैसे भरलेले असल्याने हा गुन्हा सिद्ध झालेला आहे. त्यामुळे या प्रकरणात फौजदारी कारवाई केली पाहिजे. गुन्हेगारांवर कडक कारवाई केली तर पुढील काळात असे गैरप्रकार होणार नाहीत. पैसे भरून गुन्हा माफ करणे, चुकीचे आहे. या प्रकरणात फौजदारी कारवाई झाली पाहिजे, तसेच या प्रकरणात वरिष्ठ अधिकाऱ्यांनी आरोप सिद्ध होऊनही गुन्हा दाखल न केल्याने त्यांच्यावर कोणती कारवाई करण्यात येणार आहे. या प्रकरणी वरिष्ठ अधिकाऱ्यांचीही चौकशी झाली पाहिजे. पंचायती राज समितीच्या दौऱ्यावेळेस हा प्रकार समोर आला आहे. सदरहू प्रकरणात गैरव्यवहार झाल्याचे निर्देशनास आले आहे. असे असतानाही या प्रकरणात कारवाई करण्यासाठी विलंब झालेला आहे. या प्रकरणात विधी व न्याय विभागाचे मार्गदर्शन घेण्यात यावे. शासनाच्या नियमानुसार कर्मचाऱ्याला बडतर्फ करता येते. तसेच समितीने केलेल्या मागणीनुसार या प्रकरणात फौजदारी स्वरुपातील गुन्हा दाखल करण्यात यावा. क्षेत्रीय स्तरावरील कनिष्ठ सहायकावर कारवाई केली आहे. यात महिला व बालविकास अधिकार यांची जबाबदारी होती काय, यावर अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला विदित केले की, या प्रकरणात महिला व बालविकास अधिकार यांनी स्वतः हा गैरप्रकार निर्देशनास आणून दिला आहे. त्यांनी चौकशी करून अहवाल दिला आहे. त्यामुळे ते जबाबदार नाहीत. यावर समितीने या प्रकरणात चौकशी करून कारवाई करण्यात यावी. असे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांना निदेश दिले.

## अभिप्राय व शिफारशी

सन २०१२-१३ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील चर्चेच्या अनुषंगाने सांगली जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी व विभागीय सचिवांच्या साक्षीदरम्यान समितीच्या असे निदर्शनास आले की, लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध करून न देणे, नमुना ७ नसणे, या प्रकरणांमध्ये १० लाख ४० हजार रुपयांचा अपहार झाल्याप्रकरणी संबंधित कर्मचाऱ्यावर (क्रिमिनल ॲक्शन) फौजदारी कारवाई करण्यात येईल असे समितीला **विभागीय सचिवांचे साक्षीच्या वेळी आश्वासित करण्यात येऊनही गुन्हेगार व्यक्तीवर जिल्हा परिषद प्रशासनाने अद्यापपर्यंत फौजदारी कारवाई करून गुन्हा दाखल केला नाही, याबाबत समिती तीव्र नापसंती व्यक्त करते.**

सन २०१७ मध्ये पंचायती राज समितीने भेट दिल्यानंतर सदरहू विषय निदर्शनास आला आहे. गैरव्यवहार करणाऱ्या कर्मचाऱ्यावर १०-१० वर्षे कारवाई केली जात नाही, ही गंभीर बाब आहे. पैसे भरलेले असल्याने हा गुन्हा सिद्ध झालेला आहे. तसेच कर्मचाऱ्यांना बडतर्फ देखील करण्यात आले आहे. प्रशासकीय कारवाई केली पण फौजदारी कारवाई केली नाही त्यामुळे या प्रकरणात फौजदारी कारवाई केली पाहिजे. गुन्हेगारांवर कडक कारवाई केली तरच पुढील काळात असे गैरप्रकार होणार नाहीत व अन्य कर्मचाऱ्यांवर देखील याचा वचक राहील. या प्रकरणात वरिष्ठ अधिकाऱ्यांनी आरोप सिद्ध होऊनही गुन्हा दाखल न केल्याने त्यांनी सदरहू प्रकरण दडपण्याचा प्रयत्न केला असल्याचे दिसून येते. याप्रकरणी समिती अशा पद्धतीने प्रकरण दडपणाऱ्या अधिकाऱ्यांना देखील तेवढीच दोषी मानते जेवढी गुन्हा करणाऱ्या कर्मचाऱ्यांना मानते. **सबब, ज्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या प्रकरणात गुन्हा नोंद करण्यास विलंब केला किंवा गुन्हा दाखल केला नाही अशा सर्व संबंधित अधिकाऱ्यांविरुद्ध देखील नियमानुसार कारवाई करण्यात यावी.**

**उक्त प्रकरणी तातडीने फौजदारी गुन्हा दाखल करण्यात यावा. तसेच या प्रकरणात जबाबदार असलेल्या सर्व संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांची चौकशी करून त्यांचेविरुद्ध देखील नियमानुसार कारवाई करावी. याबाबत केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला तीन महिन्यात सादर करण्यात यावा, अशी समिती शिफारस करीत आहे.**

प्रकरण चार

## जिल्हा परिषद, सांगली (प्रशासन)

## अंदाजपत्रकानुसार रस्त्याचे व नालीचे बांधकाम न केल्याबाबत

## (पंचायत समिती, तासगाव)

पंचायती राज समितीने दिनांक २२ ते २४ नोव्हेंबर,२०१७ या कालावधीत सांगली जिल्हा परिषदेस भेट दिली असता सन २०१२-१३ या वर्षाच्या प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान सांगली जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने रायगांव ते कडेगाव तालुका- तासगाव येथे भेट दिली असता समितीला पुढीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली. रायगांव ते कडेगांव या रस्त्यांची लांबी ८.०४० किलोमीटर आहे. सदर कामाची किंमत ४२६ लाख ८० हजार रुपये आहे. सदर रस्ता चार स्तरांचा असल्याचे कनिष्ठ अभियंता यांनी समितीला सांगितले. दिनांक ६ जानेवारी, २०१७ रोजी वर्क ऑर्डर देण्यात आली आहे. समितीला टेस्टींग रिपोर्ट व कामाची एम.बी. दाखविण्यात आली नाही. मालाची टेस्टींग न करता माल वापरण्यात आला आहे. ६०० मीटर रस्त्यांचे काम अपूर्ण आहे. पीएमजेएसवायची लॅब बंद असल्याचे सांगण्यात आले. खडी व मुरुम ५ किलोमीटर अंतरावरुन आणण्यात येतो असे सांगितले. ॲप्रुव्हल चार्ट दाखविण्यात आला नाही. सदर रस्त्यावर जो पूल बांधण्यात आला त्याची उंची अतिशय कमी आहे. सदर रस्त्यावर ८० एमएम पेक्षा मोठे दगड टाकण्यात आले होते. तेथील मुरुम टेस्टसाठी समितीने घेतला. सदर पुलाखाली छोटे पाईप टाकण्यात आले आहे. करारनाम्यात कंत्राटदाराची लॅब नमूद केली असून तेथे लॅब दिसून आली नाही. सदर लॅब बंद असल्याचे सांगण्यात आले. पुलांची भिंत सरळ नाही, सेंट्रींग व्यवस्थित करण्यात आले नाही. रस्ता क्रास करताना दुसऱ्या बाजूकडील रस्ता उंच घेण्यात आला आहे. रस्त्यावर टाकण्यात आलेल्या डांबराची क्वॉलिटी बरोबर नाही. सदर रस्त्याच्या बाजूला नालीचे बांधकाम करण्यात येत असून नालीमध्ये दबाई न करता सिमेंट टाकण्यात आले आहे. इस्टीमेटमध्ये नालीची रुंदी ६० सेंटीमीटर असताना प्रत्यक्षात रुंदी मोजली असता ती ५० सेंटीमीटर आढळून आली आहे. सदर काम व्यवस्थित नसल्यामुळे अधीक्षक अभियंता यांना साक्षीला बोलविण्यात यावे असे समितीने सूचित केले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

**पंचायत समिती तासगाव :—** पंचायत समिती, तासगाव अंतर्गत मुख्यमंत्री ग्रामसडक योजना रायगांव ते कडेगाव रस्ता या कामामध्ये सदर रस्त्याच्या बाजूला नालीचे बांधकाम करण्यात येत असून नालीमध्ये दबाई न करता सिमेंट टाकण्यात आले असून अंदाजपत्रकामध्ये नालीची रूंदी ६० से.मी. असताना प्रत्यक्षात रूंदी ५० से.मी. आढळून आली आहे. या संपूर्ण कामाची सखोल चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार याप्रकरणी संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून कोणती कारवाई करण्यात आली आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत.

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

पंचायत समिती कडेगांव अंतर्गत मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेतील रायगांव ते कडेगांव रस्ता या कामामधील नालीची दबाई surface vibrater द्वारे करण्यात आलेली आहे. सदर कामाचे अंदाजपत्रक बनवताना गटरची सर्वसाधारण रूंदी ६० से.मी. इतकी धरण्यात आलेली होती. परंतु गावातील रस्त्याच्या लांबीत घरे रस्त्यास लागून असलेने गटरचे काम करताना अस्तीत्वातील रस्त्याची रूंदी कमी असलेने उपलब्ध जागेत रस्त्याच्य धावपट्टीसाठी आवश्यक ती रूंदी ठेऊन उर्वरित शिल्लक रूंदीत गटर बनविण्यात आल्याने गटरची रूंदी ५० से.मी. इतकी करण्यात आलेली आहे. सदर ५० से.मी. रूंदी करताना गटरने आकारमान सांडपाणी व पावसाने पाणी न साचता वाहून जाण्यास पुरेशी असलेबाबतची दक्षता घेण्यात आलेली आहे. त्यामुळे रूंदी जरी कमी केली असली तरीही गटरचा उपयोग होऊन पाण्याचा निचरा योग्य प्रकारे होत आहे. सदर ठिकाणी गटरचे concrete चे काम चांगल्या पद्धतीने झाले असून concrete cube टेस्टींग करून घेणेत आले आहेत सदर concrete cube चे चाचणी निष्कर्ष मानकाप्रमाणे आलेले आहेत सदर गटर (नाली) पाहणी ठिकाणची तपासणी राज्य गुणवत्ता निरीक्षक (SQM) श्री. एस. एम. कोटंभकर यांनी दिनांक २० एप्रिल, २०१८ रोजी केली असून शेरे समाधानकारक आहेत. राज्य गुणवत्ता निरीक्षक यांचे शेरे समाधानकारक असल्याने कोणतीही कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्‌वत नाही.

### मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

(१) गावातील रस्त्यांच्या लांबीत उपलब्ध होणारी अस्तित्वातील रस्त्यांची रुंदी कमी असल्याने रस्त्याच्या धावपट्टीसाठी आवश्यक रूंदी ठेवून उर्वरित रूंदीत गटर करावे लागल्याने गटर्सची रूंदी कमी झाल्याचे क्षेत्रीय अभियंत्यांनी दिलेले स्पष्टीकरण ग्राह्य धरण्यास हरकत नसावी.

(२) सदर गटर राज्य गुणवत्ता निरीक्षक यांनी तपासले आहे. तसेच कॉंक्रीटच्या चाचण्या योग्य असल्याने दिलेले स्पष्टीकरण ग्राह्य धरण्यात हरकत नसावी.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने दिनांक २२ ते २४ नोव्हेंबर, २०१७ या कालावधीत सांगली जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक २७ जानेवारी, २०२१ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, पंचायत समिती, तासगांव येथील मुख्यमंत्री सडक योजना रायगांव ते कडेगांव रस्त्याचे काम करीत असताना किती रुपयांचा खर्च झाला आहे, अंदाजपत्रकामध्ये नालीची रुंदी ६० से.मी. असताना प्रत्यक्षात रुंदी ५० से.मी. आढळून आली आहे. याचाच अर्थ कामातील खर्चाचे प्रमाण कमी झाले आहे. जर नालीचे बांधकाम कमी करण्यात आले तर कंत्राटदाराला कमी रक्कम अदा करावयास हवी होती. अंदाजपत्रक तयार करतानाच ते तशा प्रकारे तयार करावयास हवे होते. अंदाजपत्रक तयार करताना कोणतेही मोजमाप घेतले गेले नव्हते, असाच त्याचा अर्थ आहे. यावर अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विशद केले की, ढोबळमानाने नालीची रुंदी ६० सें.मी. गृहीत धरण्यात आली होती. परंतु काही ठिकाणी तेवढी जागा उपलब्ध नव्हती. त्यामुळे नालीची रुंदी ५० सें.मी. करण्यात आली असून एमबीमध्येही ५० सें.मी.ची नोंद करण्यात आली आहे. याबाबत कागदपत्रे उपलब्ध आहेत. तसेच कामाचे मुल्यांकनही ६० हजार रुपयांच्या जवळपास आहे. तसेच १२५ मीटर लांबीच्या नालीचे काम होते.

तद्नंतर समितीने मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतील या रस्त्याची माहिती देण्यात यावी. असे सुचविले असता, कार्यकारी अभियंता यांनी समितीस पुढीलप्रमाणे विदित केले की, सदरहू रस्ता रायगाव ते कडेगावपर्यंत होता. या रस्त्याची एकूण लांबी ८ कि.मी. असून नालीची लांबी १२५ मीटर एवढी आहे. त्याची प्रशासकीय मान्यता ४ कोटी २७ लाख रुपयांची होती. तसेच देखभाल व दुरुस्तीसाठी २९ लाख रुपयांची मान्यता देण्यात आली होती. यावर समितीने विचारले की, सदरहू रस्त्याचे आतापर्यंत किती देयक अदा करण्यात आले आहे. यावर कार्यकारी अभियंता यांनी याबाबतची माहिती घेऊन उत्तर देतो असे समितीला सांगितले.

पुढे समितीने निदेशीत केले की, ज्यावेळेस विभागाची साक्ष आयोजित होते त्यावेळेस विभागाने सर्व माहितीसह उपस्थित राहिले पाहिजे. या प्रकरणात ४ कोटी २७ लाख रुपयांची प्रशासकीय मान्यता होती. हे काम पूर्ण झालेले आहे. असे असताना या कामासाठी किती रुपयांचे देयक अदा करण्यात आले आहे, कोणत्याही प्रकारची माहिती न घेता समितीसमोर उत्तर देणे योग्य नाही. विभागाकडून समितीकडे जी कागदपत्रे सादर करण्यात आली आहेत, त्यामध्ये सर्व माहिती नमूद केली आहे. असे असताना आपणांस या विषयाची संपूर्ण माहिती नाही. ही बाब योग्य नाही. कार्यकारी अभियंत्यांना त्यांच्या विभागातील रस्त्यांच्या सर्व कामांची माहिती असली पाहिजे, अशी समितीने नाराजी व्यक्त केली. यावर अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे स्पष्टीकरण दिले की, सदरहू परिच्छेद नालीच्या बांधकामासंदर्भात असल्याने विभागाच्या अधिकाऱ्याकडून केवळ नालीच्या बांधकामासंदर्भात अभ्यास करण्यात आला आहे. तद्नंतर समितीने असे निदर्शनास आणून दिले की, नालीची लांबी ६० सें.मी. आहे. असे असताना ५० सें.मी. लांबीपर्यंतच नालीचे बांधकाम करण्यात आले आहे. याचाच अर्थ १० सें.मी. कमी बांधकाम झाले आहे. कमी झालेल्या बांधकामातील शिल्लक रक्कम इतर ठिकाणी वापरण्यात आली आहे काय, ४ कोटी २६ लाख रुपयांपैकी किती रक्कम देण्यात आली आहे, याची माहिती कार्यकारी अभियंत्यांना असली पाहिजे. अपूर्ण माहिती घेऊन समितीसमोर उत्तरे देणे योग्य नाही. कार्यकारी अभियंत्यांना ज्या विषयाची साक्ष घेण्यात येत आहे, त्या विषयाची माहिती नसणे हे योग्य नाही. समितीसमोर माहिती घेऊन साक्ष दिली पाहिजे. हे काम झाल्यानंतर एसक्युएम आणि एसएसक्युएम यांनी भेट देऊन पाहणी केली आहे काय, यावर कार्यकारी अभियंता यांनी समितीस विदित केले की, एसएसक्युएम यांनी ३ आणि एसक्युएम यांनी एक भेट दिली आहे. त्यांनी या कामासंदर्भात समाधानकारक अभिप्राय दिला आहे. तद्नंतर समितीने कार्यकारी अभियंता यांना असे निदर्शनास आणून दिले की, या कामासंदर्भात समाधानकारक असल्याचा अहवाल किंवा अभिप्राय हा विश्रामगृहात बसून दिला जातो. ज्यावेळेस त्यांनी भेट दिली होती त्यावेळेस ५० से.मी. चे काम झाल्याचे त्यांच्या निदर्शनास आले होते काय, पुढे समितीने कार्यकारी अभियंता यांना असे निदेश दिले की या कामासंदर्भातील सर्व माहिती समितीस द्यावी.

## अभिप्राय व शिफारशी

पंचायती राज समितीने दिनांक २२ ते २४ नोव्हेंबर, २०१७ या कालावधीत सांगली जिल्हा परिषदेस भेट दिली असता सन २०१२-२०१३ या वर्षाच्या प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान सांगली जिल्हा परिषदेकडून सादर करण्यात आलेल्या माहितीत निदर्शनास आले की, पंचायत समिती तासगाव येथील रायगांव ते कडेगाव या ८ कि.मी. रस्त्याचे काम मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत करण्यात आले असून सदर रस्त्यासाठी चार कोटी सत्तावीस लाख रुपयांची प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. सदर रस्त्याच्या बाजूला नालीचे बांधकाम अंदाजपत्रकामध्ये ६० सें.मी. लांबीचे असताना ५० सें.मी. लांबीपर्यंत करण्यात आले असल्याने नालीचे १० सें.मी. कमी बांधकाम केले आहे.

**या विषयासंदर्भात समितीसमोर साक्षीसाठी येताना कार्यकारी अभियंता यांनी सविस्तर माहितीसह उपस्थित राहून साक्ष देणे बंधनकारक असताना सदर रस्त्याचे आतापर्यंत किती देयके अदा करण्यात आलेली आहेत याबाबतची समाधानकारक माहिती कार्यकारी अभियंत्यांनी समितीसमोर सादर केली नाही, यावर समिती तीव्र नाराजी व्यक्त करीत आहे.**

तसेच एसएसक्युएम व एसक्युएम यांनी सदर रस्त्याची पाहणी करताना त्यांना अंदाजपत्रकात नमूद ६० से.मी. लांबीच्या नालीचे बांधकाम ५० से.मी. ढोबळमानाने केले असल्याचे निदर्शनास आले आहे व तशी नोंद देखील मोजमाप पुस्तिकेत घेतली आहे. विभागीय सचिवांनी त्यांच्या लेखी स्पष्टकरणामध्ये "गावातील रस्त्यांच्या लांबीत उपलब्ध होणारी अस्तित्वातील रस्त्यांची रुंदी कमी असल्याने रस्त्यांच्या धावपट्टीसाठी आवश्यक रुंदी ठेवून उर्वरित रुंदीत गटर करावे लागल्याने गटर्सची रुंदी कमी झाल्याचे संबंधित अधिकाऱ्यांनी दिलेले स्पष्टीकरण ग्राह्य धरण्यास हरकत नसावी. तसेच सदर गटर राज्य गुणवत्ता निरिक्षक यांनी तपासले असून काँक्रीटच्या चाचण्या योग्य असल्याचे दिलेले स्पष्टीकरण समितीने ग्राह्य धरण्यास हरकत नसावी" असे नमूद केले आहे. विभागाचा खुलासा मान्य केला तरी अंदाजपत्रकात त्रुटी ठेवणे ही बाब योग्य नाही, यास्तव याप्रकरणी संबंधित अधिकाऱ्यांविरुद्ध कारवाई करणे समितीला इष्ट वाटते. जेणेकरुन भविष्यात असे त्रुटींचे व दोषपूर्ण अंदाजपत्रक सदर अधिकारी तयार करणार नाही. तसेच बांधकामातील शिल्लक रक्कम इतर ठिकाणी वापरण्यात आली आहे किंवा कसे यासह रस्त्याच्या बांधकामाची सविस्तर तपासणी करून त्याबाबत तीन महिन्याच्या आत माहिती सादर करण्याची समिती शिफारस करीत आहे.

प्रकरण पाच

## जिल्हा परिषद, सांगली (प्रशासन)

## राष्ट्रीय पेयजल योजनेअंतर्गत पाणीपुरवठा योजनेच्या कामाबाबत

## (पंचायत समिती, जत)

पंचायती राज समितीने दिनांक २२ ते २४ नोव्हेंबर,२०१७ या कालावधीत सांगली जिल्हा परिषदेस भेट देऊन तेथील ग्रामपंचायत कार्यालय, डफळापूर, तालुका जत येथे पाहणी केली असता समितीच्या असे निदर्शनास आले की, या गावात राष्ट्रीय पेयजल योजनेच्या माध्यमातून पाणीपुरवठा योजनेचे काम हाती घेण्यात आलेले आहे. सदर कामाची अंदाजपत्रकीय किंमत ७.५ कोटी रुपये आहे. आतापर्यंत या योजनेवर ३ कोटी रुपये खर्च करण्यात आलेले आहेत. पाणीपुरवठा योजनेबाबत गावकऱ्यांच्या असंख्य तक्रारी असल्यामुळे सदर कामाची उच्च स्तरीय समिती नेमून चौकशी करावी व सदर पाणीपुरवठा योजनेचे काम तत्काळ पूर्ण करून गावाला पाणीपुरवठा करण्याची कार्यवाही जिल्हा परिषदेने करावी, असे समितीने संबंधित अधिकाऱ्यांना सांगितले. तद्नंतर समितीने मासिक सभेचे रजिस्टर बघितले असता दिनांक २१ नोव्हेंबर, २०१७ रोजी झालेल्या मासिक सभेच्या इतिवृत्ताची नोंद घेण्यात आलेली नसल्याचे आढळून आले. तसेच, ग्रामपंचायतीने ३ महिन्यांपूर्वी पाण्याचे फिल्टर व प्रोजेक्टर मशीन खरेदी करून जिल्हा परिषदेच्या शाळेला पुरविलेले आहे. परंतु, अद्याप फिल्टर सुरू करण्यात आलेले नाही. फिल्टर खरेदीच्या कोटेशनवर तारीख नमूद केलेली नसल्याचे समितीला आढळून आले.

रस्त्याचे कॉंक्रीटीकरण व गटार बांधकाम करणे यासाठी ३ लाख रुपयांचे बांधकाम साहित्य खरेदी करण्यात आलेले आहे. परंतु, खरेदी केलेल्या साहित्याचे देयक व्यवस्थित नाही, दरपत्रक घेण्यात आलेले नाही. यामध्ये मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार झाल्याचे दिसते. त्यामुळे ग्रामपंचायतीने १४ व्या वित्त आयोगातून केलेल्या सर्व कामांची चौकशी करण्यात यावी, विस्तार अधिकारी श्री.पी.एस.चव्हाण यांनी कामाची पाहणी करून याकडे दुर्लक्ष केलेले आहे. याबाबत समितीने तीव्र नाराजी व्यक्त केली.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली :—**

**पंचायत समिती जत.—**ग्रामपंचायत कार्यालय, डफळापूर, ता.जत, जि.सांगली येथे राष्ट्रीय पेयजल योजनेच्या माध्यमातून पाणीपुरवठा योजनेचे रूपये ७.५ कोटी एवढया अंदाजपत्रकीय किंमतीचे काम हाती घेण्यात आले होते, या योजनेवर रूपये ३ कोटी एवढा खर्च करण्यात आलेला असून गावकऱ्यांच्या पाणीपुरवठा योजनेबाबत असंख्य तक्रारी असल्यामुळे सदर कामाची उच्चस्तरीय समिती नेमून चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास चौकशीत काय आढळून आले व याप्रकरणी संबंधित जबाबदार अधिकाऱ्याविरूद्ध व ठेकेदारांविरूद्ध कोणती कारवाई करण्यात आली आहे तसेच सदर योजनेचे काम तात्काळ पूर्ण करून गावाला त्वरीत पाणीपुरवठा करण्याच्या दृष्टीने जिल्हा परिषदेने कोणती कार्यवाही केली आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत.

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली :—**

डफळापूर गावास राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यकमाअंतर्गत रुपये ७.५ कोटी इतक्या अंदाजपत्रकीय किमतीचे काम सन २०११-१२ मध्ये हाती घेण्यात आले आहे. या योजनेच्या कामावर सद्यःस्थितीत रुपये ५.४६ कोटी इतका खर्च करण्यात आलेला आहे.

योजनेबाबत गावकऱ्याच्या तक्रारी आल्याने विभागीय आयुक्त, पुणे कार्यालयातील उप अभियंता, (ज.स्व.) व शाखा अभियंता आयुक्त कार्यालय यांच्या समितीद्वारे चौकशी करून सादर केलेल्या अहवालावर आयुक्त पुणे दिनांक १/६/२०१८ रोजी दिलेल्या आदेशानुसार पुन्हा गट विकास अधिकारी, कवठे महांकाळ, उप अभियंता, पंचायत समिती, तासगाव व शाखा अभियंता, विस्तार अधिकारी, सहायक लेखाधिकारी, यांनी चौकशी करून अहवाल सादर केला आहे.

चौकशी अहवालानुसार अध्यक्ष/सचिव ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समिती, लेखा परिक्षण समिती व तांत्रिक सेवा पुरवठादार यांच्यावर अनियमितता प्रकरणी कारवाईबाबत दिनांक २९ सप्टेंबर २०१८ रोजी नोटीस बजावण्यात आली होती. सदर कारवाईस मा राज्यमंत्री पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग यांच्या दिनांक ६ ऑक्टोबर २०१८ च्या निर्देशानुसार स्थगिती देण्यात आली आहे.

शासनाच्या दिनांक ९ जानेवारी २०१९ च्या पत्रान्वये सदरचे काम अस्तित्वातील समितीकडून पूर्ण करून घेण्यास मान्यता देण्यात आली आहे.

योजनेचे काम जलदगतीने पूर्ण होण्याच्या दृष्टीने मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली यांनी दिनांक १० नोव्हेंबर २०२० व दिनांक १६ डिसेंबर २०२० रोजी आढावा घेण्यात आला आहे.

आतापर्यंत योजनेचे टप्पा-१ चे काम १००%, टप्पा-२ मधील उप विभागाची कामे ८०% पूर्ण करण्यात आली आहेत तसेच टप्पा-३ ची कामे ७५% पूर्ण करण्यात आली आहेत. योजनेची उर्वरित कामे दिनांक ३१ मार्च २०२१ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

**मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय**

डफळापूर ता. जत पाणीपुरवठा योजनेमध्ये आढळून आलेल्या अनियमितता प्रकरणी करावयाच्या वसुलीस मा. राज्यमंत्री (पा.पु.) यांनी दिलेली स्थगिती उठविण्याबाबत अहवाल घेऊन उचित कार्यवाही करण्यात येईल.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने सांगली जिल्हा परिषदेतील पंचायती समिती, जत येथे दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक २७ जानेवारी, २०२१ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, पंचायत समिती, जत येतील राष्ट्रीय पेयजल योजनेअंतर्गत पाणीपुरवठा योजनेच्या कामाबाबत समितीला माहिती देण्यात यावी. यावर अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे समितीला माहिती दिली की, या योजनेसंदर्भात दिनांक १० व ११ नोव्हेंबर, २०२० रोजी बैठक घेण्यात आली होती. त्यानंतर पुन्हा दिनांक १६ डिसेंबर, २०२० रोजी बैठक घेतील होती. सदरहू कामांपैकी राहिलेले काम दिनांक २८ फेब्रुवारी, २०२१ पर्यंत पूर्ण होईल व दिनांक ३१ मार्च, २०२१ च्या अगोदर या कामाचे देयक अदा केले जाईल.

समितीने विचारणा केली की, ग्रामीण भागातील किती योजना सुरू आहेत, याचा विभागाने आढावा घेतला पाहिजे. प्रत्येक जिल्ह्यात त्रयस्थ व्यक्तीमार्फत या योजनांची तपासणी केली पाहिजे. ग्रामीण भागांतील सर्व योजना अपूर्ण स्थितीत आहेत. याचे कारण असे की, पाणीपुरवठा ग्राम समिती अध्यक्षांना त्या योजनेचे अधिकार देण्यात आले होते. ग्रामसेवक हा त्या समितीचा सचिव असतो. अनेक ठिकाणी कंत्राटदार आणि पाणीपुरवठा ग्राम समितीच्या अध्यक्षांनी योजना पूर्ण न करता पैसे घेतलेले आहेत. या कारणामुळे त्या योजना अपूर्णावस्थेत आहेत. १० टक्के गावांमध्येच पाणीपुरवठ्याच्या योजना सुरू असतील. तसेच पाणीपुरवठा योजना सुरू केल्यानंतर काही कालावधीत त्या बंद पडत असतात. हे चित्रही अनेक ठिकाणी आहे. या योजनेसोबतच इतरही अनेक योजना अशाच प्रकारे अपूर्ण अवस्थेत आहेत. त्यामुळे याबाबत विभागाकडून काय कार्यवाही केली जाणार आहे. तसेच राष्ट्रीय पेयजल योजना, महाजल योजनांबाबतही अशीच परिस्थिती आहे. कंत्राटदार गावातील समिती प्रमुखांच्या लोकवर्गणीतून कंत्राट भरत असे. यातून अनेक ठिकाणी निकृष्ट दर्जाची कामे करण्यात आली होती. काही ठिकाणी पाण्याची योजना सुरू केली आहे. पाईपलाईन टाकण्यात आली आहे, विहिरदेखील बांधण्यात आली आहे, परंतु पाणी नसल्याने ती योजना बंद आहे. खर्च होऊनही लोकांना पाणी उपलब्ध होत नाही. मागील काळात या योजनांवर ज्या ठिकाणी खर्च झाला होता, तो चुकीच्या पद्धतीने करण्यात आला आहे.

अपर मुख्य सचिव पाणीपुरवठा विभाग यांनी समितीस पुढीलप्रमाणे खुलासा केला की, सुरुवातीला भारत निर्माण योजना अस्तित्वात होती. सदरहू योजना सन २००९ मध्ये बंद करण्यात आली होती. आता केंद्र शासन पुरस्कृत राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजना सुरू आहे. सन २००९ मध्ये एनआरडीडब्ल्युपी योजना बंद करण्यात आली आहे. आता 'जलजीवन मिशन' ही नवी योजना अंमलात आली आहे. या योजनेसाठी एक सॉफ्टवेअर तयार करण्यात आले आहे. यानुसार कोणत्या गावात कोणती योजना आहे त्या योजनेची काय स्थिती आहे याची माहिती मिळते. दीड वर्षापूर्वी विभागाने या योजनांसदर्भात आढावा घेतला होता. त्यावेळेस ११ हजार योजना काही कारणांमुळे पूर्ण होऊ शकल्या नाहीत. अनेक योजनांद्वारे पाणीपुरवठा सुरू होता. काही ठिकाणी पाणीपुरवठा समितीचे प्रश्न निर्माण झाले होते. प्रत्येक योजनेचा आढावा विभागाने घेतला होता. सद्यःस्थिती ११०० योजना अपूर्ण अवस्थेत आहेत. मध्यंतरी माननीय मुख्यमंत्र्यांनी राज्यातील सर्व मुख्याधिकाऱ्यांसोबत संयुक्त बैठक आयोजित केली होती. राज्यातील अपूर्ण योजना पूर्ण होण्यासाठी आराखडा देण्यात आला आहे. मागील दीड वर्षापासून अनेक योजना बंद करण्यात आल्या आहेत. ज्या ठिकाणी अपूर्ण योजना असेल व अधिक निधी खर्च करण्याची आवश्यकता असेल त्याठिकाणी जलजीवन योजनेंतर्गत निधी देऊन त्या योजना सुरू करता येतील व त्यानुसार आराखडा तयार करण्यात यावा, अशा प्रकारच्या सूचना देण्यात आल्या आहेत. या योजनेत ५ कोटी ६० लाख रुपयांचा खर्च करण्यात आला आहे. तसेच यात कामाचे डिस्ट्रीब्यूशन व्हावयाचे आहे. विभागाकडून मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांचा आढावा घेण्यात आला आहे. माहे फेब्रुवारी, २०२१ महिन्याच्या शेवटपर्यंत या योजनेचे काम पूर्ण होऊन गावात पाणीपुरवठा करण्यात येईल.

पुढे समितीने अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांना विचारणा केली की, अनियमिततेच्या वसुली बाबतची सद्यःस्थिती काय आहे. यावर अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला प्राथमिक वसुली सुमारे १०.९० लाख रुपयांची होती. वॅट व विम्याची अनामत रक्कम होती. पंचायत समितीच्या पाणीपुरवठा समितीने रक्कम कपात करून घेतली आहे. परंतु शासनाच्या खाती रक्कम जमा करण्यात आली नव्हती. ५ लाख रुपयांच्या आसपास कामाच्या रकमेचा फरक होता तो पुढील देय रकमेतून वजा करण्यात आला आहे व उर्वरित कपातींची रक्कम संबंधित खात्यामध्ये जमा करण्यात आली आहे. तसेच कपात केलेली रक्कम शासनाच्या खाती जमा करण्यात आली नव्हती. बऱ्याच ठिकाणच्या ग्रामीण भागातील पाणीपुरवठा समितीचे अध्यक्ष व सचिव हे अशासकीय आहेत. त्यांना कामकाजाचे संपूर्ण ज्ञान नसल्याने रक्कम शासनाच्या खाती जमा करण्याचे राहून गेले होते.

यावर समितीने पुढीलप्रमाणे मत व्यक्त केली की, केंद्र व राज्य शासनाच्या योजनांचा हेतू चांगला आहे. उक्त योजनेच्या अनुषंगाने पाणीपुरवठा समिती गठीत करण्यात आली होती. त्या समितीला तांत्रिक ज्ञान असण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. त्यांनी टीएसपी त्यांच्या सोयीनुसार नियुक्त केला होता. पाण्याचा स्त्रोत योग्य ठिकाणी शोधला पाहिजे. उक्त ७.५ कोटी रुपयांची योजना पाण्याचा स्त्रोत फेल गेल्याने यशस्वी झाली नाही. तसेच पाणी उपलब्धतेअभावी अनेक योजना बंद पडल्या आहेत. तद्नंतर समितीने काही राज्यांमधील पुढीलप्रमाणे उदाहरणे देत सांगितले की, राजस्थान, मध्य प्रदेश व केरळ राज्यातील काही योजनांची पाहणी केली असता काही राज्यांमध्ये पाणीपुरवठा योजना तयार करीत असताना धरणातून पाण्याचा स्त्रोत घेतला आहे. परंतु त्यावरील खर्च आपल्याला थोडासा अधिक वाटतो. धरणातून पाण्याचा स्त्रोत घेऊन बाहेर त्यावर फिल्टर प्लँट उभारावा लागतो. या योजनेमध्ये वीजेचा वापर पाणी उचलणे व फिल्टर करणे यासाठी करावा लागतो. फिल्टर प्लँट येथून उंच टेकडीवर पाण्याची टाकी बांधून त्यामध्ये पाणी सोडून ते पाणी ग्रॅव्हीटीच्या माध्यमातून १६ ते १७ गावापर्यंत पोहोचविण्याच्या योजना काही राज्यात खूप यशस्वी झाल्या आहेत. आता जल जीवन मिशनच्या माध्यमातून पाणीपुरवठा योजना राबविता येतात. मध्य प्रदेश व राजस्थान राज्यामध्ये राबविलेल्या पाणीपुरवठा योजना उत्कृष्ट आहेत व त्या यशस्वी झालेल्या आहेत.

यावर अपर मुख्य सचिव, पाणीपुरवठा विभाग यांनी पुढीलप्रमाणे विदित केल की, आपल्या राज्यातील ८० टक्के योजना भूजलावर आधारित आहेत. अशा पद्धतीच्या योजना २०-२५ वर्षापासून राबविण्यात आल्या आहेत. आता भूजल स्त्रोत कमी होत आहेत. त्यामुळे आता सरफेस वॉटर स्त्रोत असतो त्याची अधिक मागणी करण्यात येत आहे. परंतु या पद्धतीने बऱ्याच अंतरावरुन पाईपद्वारे पाणीपुरवठा करावा लागतो. जल जीवन मिशन अंतर्गत १२ महिने शाश्वत पाणी स्त्रोत उपलब्ध राहील, अशा दृष्टीकोनातून योजना राबविण्याबाबत सूचना दिल्या आहेत. त्याचे नियोजन हळूहळू सुरू आहे. ज्या ठिकाणच्या प्रादेशिक पाणीपुरवठा योजना बंद आहेत त्यांचे पुनर्जीवन करण्यासाठी मुख्यमंत्री ग्रामीण पाणीपुरवठा आणली आहे. त्यानुसार कार्यवाही सुरू आहे. यावर समितीने होकारत्मक प्रतिक्रिया दर्शविली.

**अभिप्राय व शिफारशी**

पंचायती राज समितीने दिनांक २२ ते २४ नोव्हेंबर, २०१७ या कालावधीत सांगली जिल्हा परिषदेस भेट देऊन तेथील ग्रामपंचायत कार्यालय डफळापूर ता. जत, जि. सांगली येथे पाहणी केली असता समितीच्या निदर्शनास आले की, येथे राष्ट्रीय पेयजल योजनेच्या माध्यमातून रूपये ७.५ कोटी एवढ्या अंदाजपत्रकीय पाणीपुरवठा योजनेचे काम सुरू करण्यात आले आहे. या योजनेबाबत असंख्य तक्रारी असल्यामुळे या प्रकरणाची चौकशी करून संबंधितांवर कारवाई करण्याचे निदेश समितीने दिले. त्यानुसार विभागीय आयुक्त पुणे, यांच्याकडून केलेल्या चौकशी अहवालानुसार अनियमिततेची वसूली करून शासनाच्या खाती रक्कम जमा करून घेण्यात आली आहे. याबाबत समिती समाधान व्यक्त करीत आहे.

या विषयाच्या अनुषंगाने समितीच्या असेही निदर्शनास आले की, **राज्यात सद्यःस्थितीत ११०० पाणीपुरवठा योजना अपूर्ण अवस्थेत असून या योजनांवर अधिक निधी खर्च करण्याची आवश्यकता असल्याने त्यानुसार आराखडा तयार करावा लागेल तसेच राज्यात ८०% योजना भुजलावर आधारीत असून भुजल स्त्रोत कमी होत असल्याने सरफेस वॉटर स्त्रोताची मागणी वाढली आहे. यास्तव जलजीवन मिशन अंतर्गत १२ महिने शाश्वत पाणी स्त्रोत उपलब्ध राहिल अशा दृष्टीकोनातून योजना राबविण्यात याव्यात. तसेच ज्या ठिकाणच्या प्रादेशिक पाणीपुरवठा योजना बंद अवस्थेत आहेत त्यांचे पुनर्जीवन करण्यासाठी योग्य ती कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती तीन महिन्याच्या आत सादर करण्यात यावी अशी समिती शिफारस करीत आहे.**

प्रकरण सहा

## जिल्हा परिषद, सांगली (प्रशासन)

## सौर कंदील व नॅपसॅक स्प्रेअर वाटपाबाबत

## (पंचायत समिती, कवठेमहांकाळ)

पंचायती राज समितीने दिनांक २२ ते २४ नोव्हेंबर, २०१७ या कालावधीत सांगली जिल्हा परिषदेतील कवठेमहांकाळ येथे भेट देऊन पाहणी केली असता सन २०१२-१३ या वर्षाच्या प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान पंचायत समिती, कवठेमहांकाळ येथील कृषी अधिकारी यांनी सन २०१३-१४ व २०१४-१५ मध्ये खरेदी केलेले सौर कंदील याबाबत अशी माहिती दिली की, पंचायत समितीच्या गोडाऊनमध्ये ५ सौर कंदिल आहेत. ते दुरुस्त करून घेतलेले आहेत. सन २०१४-१५ मध्ये सौर कंदिल खरेदी करण्यात आले होते. त्यांचे वाटप करावयाचे राहिले आहे. एका सौर कंदिलची किंमत २,०५०/- रुपये आहे. एकूण ८१ सौर कंदिल आहेत. त्यांची एकुण किंमत १ लाख ६० हजार रुपये आहे. तसेच, नांगर नादुरुस्त असल्यामुळे संबंधित पुरवठादाराकडे पत्र व्यवहार केलेला आहे. एका नांगराची किंमत ११००/- रुपये आहे. यावर समितीने विचारणा केली की, पंचायत समितीच्या गोडाऊनमध्ये ३ नांगर, सन २०१३-१४ मध्ये खरेदी करण्यात आलेले २५ सौर कंदिल, सन २०१४-१५ मध्ये खरेदी करण्यात आलेले ८१ सौर कंदिल व ५ नॅपसॅक स्प्रेअर हे साहित्य शिल्लक आहे. सदर साहित्याची रक्कम गट विकास अधिकारी व कृषी विकास अधिकारी यांच्या वेतनातून वसूल करण्यात यावी. सौर कंदिलच्या बॅटऱ्या खराब झालेल्या आहेत काय. यावर कृषी अधिकारी यांनी खुलासा केला की, सौर कंदिलच्या बॅटऱ्या खराब असल्यामुळे ते वाटप करण्यात आलेले नाहीत. पुरवठादाराकडे तक्रार केल्यानंतर त्यांनी बॅटऱ्या बसवून दिलेल्या आहेत. लवकरच लाभार्थ्यांना सौर कंदिल वाटप करणार आहोत. यावर समितीने विचारणा केली की, सन २०१४-१५ मध्ये सौर कंदिल खरेदी करण्यात आलेले आहेत. त्याच वेळी लाभार्थ्यांना ते वाटप केले असते तर ते खराब झाले नसते. लाभार्थ्यांची निवड कोणामार्फत केली जाते. यावर गट विकास अधिकारी यांनी समितीस विदित केले की, पंचायत समिती स्तरावर लाभार्थ्यांची निवड केली जाते. पंचायत समितीचे सभापती, सदस्य, गट विकास अधिकारी बैठक घेऊन लाभार्थी निश्चित करतात. यावर समितीने विचारणा केली की, लाभार्थ्यांची यादी पंचायत समितीच्या बैठकीत मान्य करून घेण्यात आलेली आहे काय. यावर नाही असे उत्तर देऊन पंचायत समितीच्या बैठकीत सभापती व पदाधिकाऱ्यांना माहिती देतो. असा खुलासा कृषी अधिकारी यांनी केला असता. पंचायत समितीचे सभापती, पदाधिकारी यांना कोणतीही माहिती दिली जात नाही. मग लाभार्थ्यांची यादी कशी निश्चित केली जाते, असा समितीने प्रश्न विचारला असता कृषी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, लाभार्थ्यांची नावे सूचवावयाची आहेत असे पंचायत समितीचे सभापती व पदाधिकाऱ्यांना मासिक बैठकीच्या वेळी सांगितले जाते. लाभार्थी अल्पभूधारक असला पाहिजे, ५ एकरापेक्षा कमी जमीन असली पाहिजे असे निकष आहेत. यावर कृपया समितीला चुकीची माहिती देऊ नये. सभापती, पदाधिकारी यांच्या बरोबर समन्वय न साधता योजना राबविली जाते हे बरोबर आहे काय अशी समितीने नाराजी व्यक्त करीत विचारणा केली की सभापती व पदाधिकारी यांच्या बरोबर संपर्क ठेवत नाहीत, अशी समितीकडे तक्रार प्राप्त झालेली आहे. यावर गट विकास अधिकारी यांनी समितीस विदित केले की, सभापती व पदाधिकारी यांच्या बरोबर समन्वय ठेवला जातो. पंचायत समितीच्या मासिक बैठकीत प्रत्येक विषयावर चर्चा होते.

यावर समितीने विचारणा केली की, सभापती व पदाधिकाऱ्यांबरोबर समन्वय ठेवून काम केले जाते. मग सौर कंदिलचे एवढे दिवस वाटप का झाले नाही. पंचायत समितीचे सभापती व सदस्यांचा गावात संपर्क असल्यामुळे ते एका दिवसात लाभार्थ्यांची नावे सूचवू शकतात. आपण पंचायत समितीच्या बैठकीत सभापती व पदाधिकाऱ्यांना याबाबत माहिती दिली पाहिजे. गट विकास अधिकाऱ्यांचे कामामध्ये लक्ष नाही. समितीस मिळालेल्या उत्तराने समितीने पुढीलप्रमाणे नाराजी व्यक्त केली की, पंचायत समितीकडे २६ लाख रुपये शिल्लक आहेत. परंतु आपण खर्चाचे कोणतेही नियोजन केलेले नाहीत.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली :—**

**पंचायत समिती, कवठेमहांकाळ :—** (१) सन २०१३-१४ मध्ये खरेदी करण्यात आलेले २५ सौर कंदील, सन २०१४-१५ खरेदी करण्यात आलेले ८१ सौर कंदील तसेच ५ नॅपसॅक स्प्रेपंप वापराविना असल्याने जिल्हा परिषदेच्या कृषि विभागाकडे जमा न करण्याची कारणे काय आहेत, याप्रकरणी संबंधितांविरुद्ध जबाबदारी निश्चित करून केलेल्या कारवाईचा अहवाल समितीस सादर करण्यात यावा.

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली :—**

पंचायत समिती, कवठेमहांकाळ सन २०१३-१४ मध्ये खरेदी करण्यात आलेले २५ सौर कंदील, सन २०१४-१५ मध्ये खरेदी करण्यात आलेले ८१ सौर कंदील तसेच ५ नॅपसॅक स्प्रेपंप शिल्लक असल्याबाबत चौकशी करण्यात आली. सदर साधने शिल्लक राहण्याबाबत संबंधित पदभार असल्याबाबत कृषि अधिकारी व विस्तार अधिकारी (कृषी) यांनी विस्तार कार्य न करणे, तसेच कर्तव्यात दिरंगाई करणे, ही कारणे निदर्शनास आली आहेत. त्याबाबत त्यांच्यावर प्रशासकीय कारवाई करून एक वेतनवाढ रोखण्यात आली आहे. तसेच तत्कालीन कृषी विकास अधिकारी यांची विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

**मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय**

**जिल्हा परिषद, सांगली यांनी केलेल्या कार्यवाहीशी सहमत.**

(१) सन २०१३-१४ मध्ये खरेदी करण्यात आलेले २५ सौर कंदिल, २०१४-१५ मध्ये खेरदी करण्यात आलेले ८१ सौर कंदिल व ५ नॅपसॅक स्प्रेअर शिल्लक आढळून आले असून लाभार्थी लाभापासून वंचित राहिले. सदर साधने शिल्लक राहिल्याने विस्तार कार्य न करणे व कर्तव्यात दिरंगाई केल्याने जबाबदार कृषि अधिकारी (जिल्हा परिषद) व विस्तार अधिकारी (कृषि) (जिल्हा परिषद) यांच्यांविरुद्ध शिस्तभंगाची कार्यवाही करून त्यांची पुढील वेतनवाढ त्यापुढील वेतनवाढीवर परिणाम न करता एक वर्षासाठी रोखण्याची शिक्षा दिनांक २५ सप्टेंबर २०१८ च्या ओदशान्वये देण्यात आली आहे.

(२) कृषि विभाग, जिल्हा परिषद, सांगली मार्फत सन २०१५-२०१६ मध्ये राबविलेल्या जिल्हा परिषद स्वनिधीतून चापकटर खरेदी करून ५० टक्के अनुदानावर लाभार्थ्यांना वाटपाकरीताच्या पंचायत समिती योजनेमध्ये अनियमितता झाल्याने सदर अनियमिततेस जबाबदार श्री.आर.जे.भोसले, तत्कालीन कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद सांगली व श्री.ए.के.कदम, जिल्हा कृषि अधिकारी (सा.) जिल्हा परिषद, सांगली यांना या विभागाच्या दि.२०.०५.२०१७ च्या आदेशान्वये निलंबित करण्यात आले. याप्रकरणी श्री. आर. जे. भोसले व श्री. ए. के. कदम तसेच इतर दोषी अधिकाऱ्यांविरुद्ध संयुक्त विभागीय चौकशीची कार्यवाही सुरू करण्याबाबत ग्रामविकास विभागास दि. ३०.०५.२०१७ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. त्यानुसार ग्रामविकास विभागाने, ग्रामविकास विभागाचे अधिनस्त अधिकारी श्री.डी.एस.पाटील, अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली व या विभागाचे दोन अधिकारी श्री.आर.जे.भोसले व श्री.ए.के.कदम यांच्यांविरुद्ध महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ मधील नियम-८/१२ अन्वये दि.३१.०७.२०१७ च्या ज्ञापनान्वये संयुक्त विभागीय चौकशी सुरू केली असून ती अंतिम टप्प्यात आहे.

(३) सौर कंदील शिल्लक राहिल्याच्या प्रमादाच्या अनुषंगाने आयुक्त (कृषि) यांनी श्री.आर.जे.भोसले, तत्कालीन कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली यांच्यांविरुद्धचे पुरवणी दोषारोपपत्र शासनास सादर केले. तथापि, श्री.आर.जे.भोसले, तत्कालीन कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली हे दिनांक ३१ मे २०१७ रोजी सेवानिवृत्त झाले असून सदरचा प्रमाद सन २०१३-१४ व सन २०१४-१५ मधील आहे. महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ मधील नियम-२७ (बी) (दोन) मधील तरतूद विचारात घेता, सद्यःस्थितीत श्री.आर.जे.भोसले यांच्यांविरुद्ध विभागीय चौकशी सुरू करता येणार नाही. मात्र, सन २०१५-२०१६ मध्ये सांगली जिल्हा परिषदेमार्फत चापकटर खरेदीप्रकरणी झालेल्या अनियमिततेच्या अनुषंगाने श्री.आर.जे.भोसले यांच्यासह सर्व संबंधितांविरुद्ध ग्रामविकास विभागाकडून सुरू करण्यात आलेली विभागीय चौकशी अंतिम टप्प्यात आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने सांगली जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक २७ जानेवारी, २०२१ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, पंचायत समिती, कवठेमहांकाळ येथे सन २०१३-१४ मध्ये खरेदी करण्यात आलेले २५ सौर कंदील, सन २०१४-१५ मध्ये खरेदी करण्यात आलेले ८१ सौर कंदील तसेच ५ नॅपसॅक स्प्रेअर वापराविना असल्याने उक्त वस्तू जिल्हा परिषदेच्या कृषि विभागाकडे जमा न करण्याची कारणे काय, याप्रकरणी संबंधितांविरुद्ध चौकशी करून जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे काय यावर अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, सौर कंदील व नॅपसॅक स्प्रेअर नंतर वाटप करण्यात आले आहेत. या प्रकरणी झालेल्या विलंबाबाबत कृषि अधिकारी व विस्तार अधिकारी यांची एक वर्षाची वेतनवाढ रोखण्यात आली आहे. यावर समितीने होकारात्मक संमती दर्शविली.

**अभिप्राय व शिफारशी**

पंचायती राज समितीने दिनांक २२ ते २४ नोव्हेंबर, २०१७ या कालावधीत सांगली जिल्हा परिषदेतील कवठेमहाकांळ येथे भेट देऊन पाहणी केली असता सन २०१३-१४ मध्ये खरेदी करण्यात आलेले २५ सौर कंदील, सन २०१४-१५ खरेदी करण्यात आलेले ८१ सौर केंदील,

५ नॅपसॅक स्प्रेअर व अन्य कृषी साहीत्य वापराविना असल्याने जिल्हा परिषदेने कृषी विभागाकडे जमा केलेली नव्हती याबाबत संबंधितांविरुद्ध जबाबदारी निश्चित करून कारवाई करण्याबाबत समितीने निदेश दिले असता विभागाकडून याबाबतची चौकशी करून या प्रकरणी झालेल्या विलंबाबाबत कृषी अधिकारी व विस्तार अधिकारी यांची एक वर्षाची वेतनवाढ रोखण्यात आली आहे. या प्रकरणी केलेल्या कार्यवाहीबाबत समिती समाधान व्यक्त करीत आहे.

**ग्रामीण भागातील अल्प भूधारक लाभार्थी शेतकऱ्यांना कृषी विभागामार्फत वाटप करण्यात येत असलेले सौर कंदील, नॅपसॅक स्प्रेअर व अन्य कृषी साहित्य जिल्हा परिषदेने ज्या वित्तीय वर्षात खरेदी केलेली आहेत त्याच वर्षी लाभार्थ्यांना वाटप होणे आवश्यक आहे. लाभार्थ्यांची निवड पंचायत समितीच्या स्तरावर करण्यात येत असल्याने गट विकास अधिकारी यांनी पंचायत समितीचे सभापती व अन्य पदाधिकारी यांच्या समवेत समन्वय ठेवणे आवश्यक आहे. यासाठी पंचायत समितीचे सभापती व पदाधिकाऱ्यांच्या मासिक बैठकीत गट विकास अधिकारी यांनी उपस्थित रहावे व कृषी विभागाच्या योजनेतील लाभार्थ्यांची निवड करणे बंधनकारक करावे व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती तीन महिन्याच्या आत सादर करण्यात यावी, अशी समिती शिफारस करीत आहे.**

प्रकरण सात

## जिल्हा परिषद, सांगली (प्रशासन)

## अंगणवाडी सेविकांच्या रिक्त पदांबाबत

पंचायती राज समितीने दिनांक २२ ते २४ नोव्हेंबर,२०१७ या कालावधीत सांगली जिल्हा परिषदेस भेट दिली असता सन २०१२-१३ या वर्षाच्या प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान सांगली जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने अशी विचारणा केली की, सांगली जिल्हापरिषदेमध्ये अंगणवाडी सेविकांची पदे भरण्यात आली नाहीत. यासंदर्भात बराच अनुशेष शिल्लक आहे. त्यासंदर्भात काय कार्यवाही करण्यात येणार आहे. यावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी, महिला व बालकल्याण यांनी समितीस पुढीलप्रमाणे माहिती दिली की, जिल्ह्यातील सर्व पदे भरण्याबाबत जाहिरात देण्यात आली होती. परंतु आचारसंहिता लागू झाल्यामुळे पदांची भरती करता आली नाही. आयुक्त कार्यालय, पुणे यांनी आता असे पत्र दिले आहे की, अंगणवाडी सेविकांची भरती करण्यात येऊ नये. वित्त विभागाच्या यासंदर्भात लेखी सूचना आहेत. वित्त विभागाने सूचना दिल्याप्रमाणे अंगणवाडी सेविकांची पदे भरण्याबाबत विनाविलंब आढावा घेण्यात येत आहे. शासनाच्या नियमाप्रमाणे भरती प्रक्रिया राबविण्यात येत आहे. यावर समितीने विचारणा केली की, अंगणवाडी सेविकांची पदे भरण्याची मागणी सन २०११ पासून करण्यात आली होती. यावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी, महिला व बालकल्याण यांनी समितीस विशद केले की, अंगणवाडी सेविकांची पदे भरण्याची मागणी करण्यात आली आहे. आयुक्त, पुणे व महिला व बालकल्याण विभाग यांना पत्र दिले आहे संपूर्ण राज्याचा हा विषय आहे. एका जिल्हा पुरता हा विषय मर्यादित नाही. पटसंख्येचा आढावा घेण्यात येत असून त्यानुसार शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात येत आहे.

तद्नंतर समितीने विचारणा केली की, यासंदर्भातील अहवाल तातडीने शासनाकडे सादर करावा. महिला व बालकल्याण विभागाकडे पटसंख्या सादर करावी. यावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी, महिला व बालकल्याण यांनी समितीस विशद केले की, यासंदर्भातील सविस्तर अहवाल तयार करून प्रस्ताव सादर करण्यात येईल.

नोकर भरतीसंदर्भात समितीने असे निदेश दिले की, हा विषय राज्यस्तरावरील असल्यामुळे वित्त विभागाचे सचिव, ग्रामविकास विभागाचे सचिव, महिला व बालकल्याण विभागाचे सचिव यांची साक्ष घेण्यात यावी. तसेच पद भरतीची प्रक्रिया सुरू होती. आचारसंहिता आल्यामुळे भरती प्रक्रिया स्थगित करण्यात आली. ४० मुलांची भरती थांबविण्यात आल्यामुळे ती मुले अडचणीत सापडली आहेत.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

**अंगणवाडी सेविकांच्या रिक्त पदांबाबत :—** सांगली जिल्हा परिषदेमध्ये अंगणवाडी सेविकांची पदे रिक्त असून अनुशेष शिल्लक आहे तसेच आयुक्त कार्यालय, पुणे यांनी अंगणवाडी सेविकांची भरती करण्यात येऊ नये असे पत्राद्वारे कळविले आहे त्यामुळे नोकरभरती यासंदर्भात वित्त विभाग, ग्रामविकास विभाग तसेच महिला व बालविकास विभाग यांचे अभिप्राय काय आहेत ;

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

महिला व बालविकास विभाग, मुंबई यांचेकडील पत्र क्र.एबावि-२०१६/प्र.क्र.१८०/का-०६, दिनांक ७ सप्टेंबर २०१६ अन्वये राज्यातील अंगणवाड्यांची सुधारित संख्या निश्चित होईपर्यंत अंगणवाडी सेविका, मदतनीस यांच्या रिक्त जागा भरण्यात येऊ नयेत अशा सूचना प्राप्त झाल्या होत्या.

सांगली जिल्ह्यामध्ये, १३ प्रकल्पामध्ये अंगणवाडी सेविका-७९, अंगणवाडी मदतनीस-१५१ व मिनी अंगणवाडी सेविका-१० पदे रिक्त होती.

महिला व बालविकास विभाग, शासन निर्णय क्र. एबावि-२०१८/प्र.क्र.२२३/का-६, दिनांक १७ जानेवारी २०२० अन्वये, अंगणवाडी सेविका, मदतनीस व मिनी अंगणवाडी सेविका, यांचे एकूण रिक्त पदापैकी ५०% रिक्त पदे भरण्यास शासनाने मंजुरी दिलेली होती. त्यानुसार सांगली जिल्ह्यातील ७९ रिक्त पदे भरण्यात आली आहेत.

माहे डिसेंबर, २०२० च्या अहवाल नुसार अंगणवाडी सेविका-१९१, अंगणवाडी मदतनीस-३२५ व मिनी अंगणवाडी सेविका-१४ पदे रिक्त आहेत सदर रिक्त पदांचा अहवाल विभागास सादर करण्यात आलेला आहे.

## मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

**महिला व बालविकास विभागाचे अभिप्राय :—** एकात्मिक बालविकास सेवा योजनेअंतर्गत अदिवासी भागातील तसेच निती आयोगाच्या महत्त्वाकांक्षी जिल्ह्यामध्ये अंगणवाडी केंद्रातील अंगणवाडी सेविका, मदतनीस व मिनी अंगणवाडी सेविका यांची रिक्त पदे भरण्याबाबत मा. मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखाली गठित केलेल्या राज्य शक्ती प्रदान कार्यक्रम समितीने नंदुरबार, गडचिरोली, उस्मानाबाद, वाशिम तसेच डावीकडील विचारसरणी यामध्ये गोंदिया, चंद्रपूर व भंडारा जिल्ह्यातील काही भाग (डावीकडील विचारसरणी अंतर्गत येणाऱ्या जिल्ह्यांची अद्ययावत यादीनुसार) तसेच संपूर्ण पालघर जिल्हा, अमरावती जिल्ह्यातील मेळघाट, धारणी आणि चिखलदरा या प्रकल्प/तालुक्यातील अंगणवाडी सेविका, मदतनीस व मिनी अंगणवाडी सेविका यांची रिक्त पदे भरण्यास दिलेल्या मान्यतेच्या अनुषंगाने सदर पदे दिनांक १ नोव्हेंबर २०१८ पासून भरण्याबाबतचे आदेश शासन निर्णय दिनांक ८ ऑक्टोबर २०१८ अन्वये निर्गमित करण्यात आले आहे.

तद्नंतर सदर समितीने एकात्मिक बालविकास सेवा योजनेची प्रभावी अंमलबजावणी होण्याच्या अनुषंगाने दिनांक ८ ऑक्टोबर २०१८ च्या शासन निर्णयान्वये मान्यता दिलेल्या क्षेत्रा व्यतिरिक्त उर्वरित सर्व क्षेत्रातील अंगणवाडी सेविका, मदतनीस व मिनी अंगणवाडी सेविका यांचे रिक्त पदापैकी ५०% पदे भरण्यास मान्यता दिली होती. त्याअनुषंगाने दिनांक १७ जानेवारी २०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये आदेश निर्गमित करण्यात आली असून त्यानुसार क्षेत्रीयस्तरावर कार्यवाही सुरू होती.

दरम्यानच्या कालावधीत वित्त विभाग शासन निर्णय दिनांक ४ मे २०२० मधील मुद्दा क्र.१४ नुसार सार्वजनिक आरोग्य विभाग व वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग वगळता कोणत्याही विभागाने कोणत्याही प्रकारची नवीन पद भरती करू नयेत असे नमूद आहे. त्यामुळे अंगणवाडी केंद्रातील रिक्त पदे भरतीची कार्यवाही करावी किंवा कसे याबाबत मार्गदर्शन मिळवणेबाबत आयुक्तालयाने विभागाकडे मार्गदर्शन मागितले आहे. त्यानुसार वित्त विभागाशी विचारविनिमय सुरू असून याबाबत निर्णय घेण्यात येत आहे.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने सांगली जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक २७ जानेवारी, २०२१ रोजी विभागीय सचिवांची साक्ष आयोजित करण्यात आली होती. साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, सांगली जिल्हा परिषदेमध्ये अंगणवाडी सेविकांची पदे रिक्त असून अनुशेष शिल्लक आहे. तसेच आयुक्त कार्यालय, पुणे यांनी अंगणवाडी सेविकांची भरती करण्यात येऊ नये, असे पत्राद्वारे कळविले आहे. त्यामुळे नोकरभरतीसंदर्भात वित्त विभाग, महिला व बालविकास विभाग, ग्राम विकास विभाग यांचे अभिप्राय काय आहेत, त्यानुसार कोणती कार्यवाही केली आहे.

यावर सचिव, महिला व बालविकास विभाग यांनी समितीस पुढीलप्रमाणे माहिती विशद केली की, विषयाचा पाठपुरावा महिला व बालकल्याण विभागाच्या माध्यमातून सातत्याने करण्यात येत होता. तसेच करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबत अभिप्रायामध्ये नमूद करण्यात आले आहे. सद्यःस्थितीत उक्त नस्ती पुन्हा वित्त विभागाकडे पाठविण्यात आली होती. माहे मार्च मध्ये उक्त नस्ती पुन्हा सादर केल्यास सन २०२१-२२ मध्ये पद भरण्याची कार्यवाही करता येईल. उक्त नस्ती वित्त विभागास माहे मार्चमध्ये पुन्हा सादर करावी लागणार आहे. त्यानंतर पद भरती होईल.

## अभिप्राय व शिफारशी

पंचायती राज समितीने दिनांक २२ ते २४ नोव्हेंबर, २०१७ या कालावधीत सांगली जिल्हा परिषदेस भेट दिली असता सन २०१२-२०१३ या वर्षाच्या प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान सांगली जिल्हा परिषदेकडून सादर करण्यात आलेल्या माहितीत निदर्शनास आले की, सांगली जिल्हा परिषदेतील अंगणवाडी सेविकांची पदे रिक्त असून याबाबतचा अनुशेष शिल्लक आहे. **सदरहू विषय फक्त या जिल्ह्यापुरता मर्यादित नसून राज्यात सर्वत्र अंगणवाडी सेविका, मदतनीस व मिनी अंगणवाडी सेविका यांची पदे रिक्त आहेत या पदसंख्येचा आढावा घेऊन या संदर्भातील अहवाल तातडीने शासनाकडे सादर करण्याचे निदेश समिती देत आहे.**

**तसेच सन २०२१-२०२२ या वर्षात अंगणवाडी सेविका, मदतनीस व मिनी अंगणवाडी सेविका यांची रिक्त पदे भरण्याची कार्यवाही करण्याच्या दृष्टीने पदसंख्येचा आढावा घेऊन याबाबतचा सविस्तर अहवाल मान्यतेसाठी वित्त विभागाकडे सादर करण्यात यावा व केलेल्या कार्यवाहीची माहिती तीन महिन्याच्या आत सादर करण्यात यावी अशी समिती शिफारस करीत आहे.**

# परिशिष्ट

## समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त

**बुधवार, दिनांक २२ नोव्हेंबर, २०१७**

स्थळ : जिल्हा परिषद सभागृह, सांगली

**उपस्थिती :**

(१) श्री. सुधीर पारवे, वि. स. स. तथा समिती प्रमुख

(२) श्री. चरण वाघमारे, वि. स. स.

(३) श्री. रणधीर सावरकर, वि. स. स.

(४) डॉ. देवराव होळी, वि. स. स.

(५) डॉ. सुरेश (भाऊ) खाडे, वि. स. स.

(६) श्री. सुधाकर कोहळे, वि. स. स.

(७) श्री. भरतशेठ गोगावले, वि. स. स.

(८) श्री. किशोर पाटील, वि. स. स.

(९) श्री. राहुल बोंद्रे, वि. स. स.

(१०) श्री. भारत भालके, वि. स. स.

(११) प्रा. विरेंद्र जगताप, वि. स. स.

(१२) श्री. राहुल मोटे, वि. स. स.

(१३) श्री. प्रविण दरेकर, वि. प. स.

(१४) श्री. विक्रम काळे, वि. प. स.

(१५) श्री. अमरनाथ राजूरकर, वि. प. स.

**निमंत्रित सदस्य :**

(१) श्री. दत्तात्रय सावंत, वि. प. स.

**जिल्हा परिषद पदाधिकारी :**

(१) श्री. संग्रामसिंह देशमुख, अध्यक्ष, जि. प. सांगली

(२) श्री. सुहास बाबर, उपाध्यक्ष, जि. प. सांगली

(३) श्री. तम्मनगौडा ई. रवि पाटील, सभापती, शिक्षण व आरोग्य, जि. प. सांगली

(४) श्री. ब्रम्हदेव पडळकर, सभापती, समाजकल्याण, जि. प. सांगली

(५) प्रा. डॉ. सुषमा नायकवडी, सभापती, महिला व बालकल्याण, जि. प. सांगली

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. विलास आठवले, उप सचिव

(२) श्री. सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी

**स्थानिक निधी लेखा :**

श्री. प्रताप मोहिते, संचालक, स्थानिक निधी लेखा

**ग्रामविकास विभाग, मंत्रालय :**

श्री. संजय बनकर, उप सचिव

**जिल्हा परिषद, सांगली :**

(१) श्री. अभिजीत राऊत, मुख्य कार्यकारी अधिकारी

(२) श्री. अजयकुमार माने, प्रकल्प संचालक तथा प्रभारी अति. मुख्य कार्यकारी अधिकारी

(३) श्री. राजेंद्र गाडेकर, मुख्य लेखा व वित्त अधिकारी

(४) श्रीमती रश्मी खांडेकर, उपायुक्त (प्रभारी)

(५) श्री. संजय माळी, कार्यकारी अभियंता, इमारत व दळणवळण

(६) श्री. एम. एस. कुलकर्णी, कार्यकारी अभियंता, पंतप्रधान ग्रामसडक योजना

(७) श्री. जे. बी. लांडे, उप अभियंता, यांत्रिक

(८) श्री. शार्दुल पाटील, उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी

(९) श्री. विवेक कुंभार, कृषि विकास अधिकारी

(१०) श्री. महेश चोथे, शिक्षणाधिकारी

(११) श्रीमती शिल्पा पाटील, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, महिला व बालकल्याण

(१२) श्रीमती दिपाली पाटील, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

(१३) श्री. एस. एस. बारटक्के, प्रभारी कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा विभाग

(१४) श्री. रविकांत अडसूळ, उप मुख्य कार्यकारी, ग्रामपंचायत विभाग

(१५) श्री. रमेश जोशी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, साप्रवि

(१६) डॉ. विजय सावंत, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी

(१७) श्रीमती नि. ब. वाघमोडे, शिक्षणाधिकारी (प्राथमिक)

(१८) श्री. राधाकिसन देवढे, जिल्हा समाजकल्याण अधिकारी

(१९) डॉ. मिलींद पोरे, अति. जिल्हा आरोग्य अधिकारी

(२०) श्रीमती अरुणा हसबे, लेखाधिकारी, शालेय पोषण आहार (प्राथमिक)

(२१) श्री. सुभाष माने, गटविकास अधिकारी, पं. स. कवठेमहाकाळ

(२२) श्री. संजय चिल्लाळ, गटविकास अधिकारी, पं. स. पलूस

(२३) श्री. मिलींद टोणपे, गटविकास अधिकारी, पं. स. जत

(२४) श्री. कृष्णा माळी, प्रभारी गटविकास अधिकारी, शिराळा

(२५) श्री. राहुल गावडे, गटविकास अधिकारी, पं. स. वाळवा

(२६) श्री. राहुल देसाई, गटविकास अधिकारी, पं. स. कडेगांव

(२७) श्री. संतोष जोशी, गटविकास अधिकारी, पं. स. खानापूर

(२८) श्री. राहुल रोकडे, गटविकास अधिकारी, पं. स. मिरज

(२९) श्री. अरुण जाधव, गटविकास अधिकारी, पं. स. तासगांव

(३०) श्रीमती मीना साळुंखे, गटविकास अधिकारी, पं. स. आटपाडी

---

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

समितीने सांगली जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर सर्व संबंधित अधिकारी यांची सन २०११-२०१२ च्या लेखापरिक्षा पुनर्विलोकन अहवालातील सांगली जिल्हा परिषदेशी सबंधित असलेल्या परिच्छेदावर साक्ष घेतली.

**गुरुवार, दिनांक २३ नोव्हेंबर, २०१७**

स्थळ : जिल्हा परिषद सभागृह, सांगली

**उपस्थिती :**

(१) श्री. सुधीर पारवे, वि. स. स. तथा समिती प्रमुख
(२) श्री. चरण वाघमारे, वि. स. स.
(३) श्री. रणधीर सावरकर, वि. स. स.
(४) डॉ. देवराव होळी, वि. स. स.
(५) डॉ. सुरेश (भाऊ) खाडे, वि. स. स.
(६) श्री. सुधाकर कोहळे, वि. स. स.
(७) श्री. भरतशेठ गोगावले, वि. स. स.
(८) श्री. किशोर पाटील, वि. स. स.
(९) श्री. राहुल बोंद्रे, वि. स. स.
(१०) प्रा. विरेंद्र जगताप, वि. स. स.
(११) श्री. दिलीप सोपल, वि. स. स.
(१२) श्री. राहुल मोटे, वि. स. स.
(१३) श्री. दिपक चव्हाण, वि. स. स.
(१४) श्री. प्रविण दरेकर, वि. प. स.
(१५) श्री. विक्रम काळे, वि. प. स.
(१६) श्री. अमरनाथ राजूरकर, वि. प. स.

**निमंत्रित सदस्य :**

(१) श्री. बाळाराम पाटील, वि. प. स.
(२) श्री. दत्तात्रय सावंत, वि. प. स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. विलास आठवले, उप सचिव
(२) श्री. सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी

**ग्रामविकास विभाग, मंत्रालय :**

श्री. संजय बनकर, उप सचिव, ग्रामविकास विभाग

**जिल्हा परिषद, सांगली :**

(१) श्री. अभिजित राऊत, मुख्य कार्यकारी अधिकारी
(२) श्री. अजयकुमार माने, प्रकल्प संचालक तथा प्रभारी अति. मुख्य कार्यकारी अधिकारी
(३) श्री. राजेंद्र गाडेकर, मुख्य लेखा व वित्त अधिकारी
(४) श्री. महेश चोथे, शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
(५) डॉ. रामचंद्र हंकारे, जिल्हा आरोग्य अधिकारी

(६) श्री. संजय माळी, कार्यकारी अभियंता, इमारत व दळणवळण (बांधकाम) विभाग

(७) श्रीमती शिल्पा पाटील, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, महिला व बालकल्याण

(८) श्रीमती दिपाली पाटील, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

(९) श्री. रविकांत आडसूळ, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, ग्रामपंचायत विभाग

(१०) श्री. एस. एस. बारटक्के, प्रभारी कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

(११) श्री. सुशिलकुमार गायकवाड, का. अ. छे. पा. वि.

(१२) श्री. विवेक कुंभार, कृषि विकास अधिकारी

(१३) श्रीमती नि. ब. वाघमोडे, शिक्षणाधिकारी (प्राथमिक)

(१४) डॉ. विजय सावंत, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी

(१५) श्रीमती नं. अी. पट्टणशेट्टी, प्रभारी निरंतर शिक्षणाधिकारी

(१६) श्री. एस. एस. कुलकर्णी, कार्यकारी अभियंता, पंतप्रधान ग्रामसडक योजना

(१७) श्री. राधाकिसन देवढे, जिल्हा समाजकल्याण अधिकारी

(१८) श्री. सुभाष माने, गटविकास अधिकारी, पं. स. कवठेमहाकाळ

(१९) श्री. संजय चिल्लाळ, गटविकास अधिकारी, पं. स. पलूस

(२०) श्री. मिलींद टोणपे, गटविकास अधिकारी, पं. स. जत

(२१) श्री. राहुल रोकडे, गटविकास अधिकारी, पं. स. मिरज

(२२) श्री. संतोष जोशी, गटविकास अधिकारी, पं. स. विटा/खानापूर

(२३) श्री. राहुल देसाई, गटविकास अधिकारी, पं. स. कडेगांव

(२४) श्री. अरुण जाधव, गटविकास अधिकारी, पं. स. तासगांव

(२५) श्री. राहुल गावडे, गटविकास अधिकारी, पं. स. वाळवा

(२६) श्रीमती मीना साळुंखे, गटविकास अधिकारी, पं. स. आटपाडी

(२७) श्री. के. जी. माळी, गटविकास अधिकारी, पं. स. शिराळा

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

समितीने सांगली जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर सर्व संबंधित अधिकारी तसेच गटविकास अधिकारी यांची सन २०१२-२०१३ च्या वार्षिक प्रशासन अहवालावरील प्रश्नावली क्रमांक -२ संदर्भात सांगली जिल्हा परिषदेच्या पंचायत समितीनिहाय संबंधित असलेल्या परिच्छेदांवर साक्ष घेतली.

**शुक्रवार, दिनांक २४ नोव्हेंबर, २०१७**

स्थळ : जिल्हा परिषद सभागृह, सांगली

**उपस्थिती :**

(१) श्री. सुधीर पारवे, वि. स. स. तथा समिती प्रमुख

(२) श्री. चरण वाघमारे, वि. स. स.

(३) डॉ. देवराव होळी, वि. स. स.

(४) डॉ. सुरेश (भाऊ) खाडे, वि. स. स.

(५) श्री. सुधाकर कोहळे, वि. स. स.

(६) श्री. भरतशेठ गोगावले, वि. स. स.

(७) श्री. किशोर पाटील, वि. स. स.

(८) श्री. राहुल बोंद्रे, वि. स. स.

(९) श्री. भारत भालके, वि. स. स.

(१०) श्री. दिलीप सोपल, वि. स. स.

(११) श्री. राहुल मोटे, वि. स. स.

(१२) श्री. प्रविण दरेकर, वि. प. स.

(१३) श्री. विक्रम काळे, वि. प. स.

**निमंत्रित सदस्य :**

(१) श्री. श्रीकांत देशपांडे, वि. प. स.

(२) श्री. दत्तात्रय सावंत, वि. प. स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. विलास आठवले, उप सचिव

(२) श्री. सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी

**स्थानिक निधी लेखा :**

श्री. प्रताप मोहिते, संचालक, स्थानिक निधी लेखा

**ग्रामविकास विभाग, मंत्रालय :**

श्री. संजय बनकर, उप सचिव, ग्रामविकास विभाग

**जिल्हा परिषद, सांगली :**

(१) श्री. अभिजीत राऊत, मुख्य कार्यकारी अधिकारी

(२) श्री. अजयकुमार माने, प्रकल्प संचालक तथा प्रभारी अति. मुख्य कार्यकारी अधिकारी

(३) श्री. राजेंद्र गाडेकर, मुख्य लेखा व वित्त अधिकारी

(४) श्रीमती रश्मी खांडेकर, उपायुक्त (प्रभारी)

(५) श्री. संजय माळी, कार्यकारी अभियंता, इमारत व दळणवळण

(शा.म.मु.) एचबी १७५३—६ (१५०-१२-२०२१)

(६) श्री. एम. एस. कुलकर्णी, कार्यकारी अभियंता, पंतप्रधान ग्रामसडक योजना

(७) श्री. जे. बी. लांडे, उप अभियंता, यांत्रिक

(८) श्री. शार्दुल पाटील, उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी

(९) श्री. विवेक कुंभार, कृषि विकास अधिकारी

(१०) श्री. महेश चोथे, शिक्षणाधिकारी

(११) श्रीमती शिल्पा पाटील, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, महिला व बालकल्याण

(१२) श्रीमती दिपाली पाटील, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

(१३) श्री. एस. एस. बारटक्के, प्रभारी कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग

(१४) श्री. रविकांत अडसूळ, उप मुख्य कार्यकारी, ग्रामपंचायत विभाग

(१५) श्री. रमेश जोशी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, साप्रवि

(१६) डॉ. विजय सावंत, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी

(१७) श्रीमती नि. ब. वाघमोडे, शिक्षणाधिकारी (प्राथमिक)

(१८) श्री. राधाकिसन देवढे, जिल्हा समाजकल्याण अधिकारी

(१९) डॉ. मिलींद पोरे, अति. जिल्हा आरोग्य अधिकारी

(२०) श्रीमती अरुणा हसबे, लेखाधिकारी, शालेय पोषण आहार (प्राथमिक)

(२१) श्री. सुभाष माने, गटविकास अधिकारी, पं. स. कवठे महाकाळ

(२२) श्री. संजय चिल्लाळ, गटविकास अधिकारी, पं. स. पलूस

(२३) श्री. मिलींद टोणपे, गटविकास अधिकारी, पं. स. जत

(२४) श्री. कृष्णा माळी, प्रभारी गटविकास अधिकारी, शिराळा

(२५) श्री. राहुल गावडे, गटविकास अधिकारी, पं. स. वाळवा

(२६) श्री. राहुल देसाई, गटविकास अधिकारी, पं. स. कडेगांव

(२७) श्री. संतोष जोशी, गटविकास अधिकारी, पं. स. खानापूर

(२८) श्री. राहुल रोकडे, गटविकास अधिकारी, पं. स. मिरज

(२९) श्री. अरुण जाधव, गटविकास अधिकारी, पं. स. तासगांव

(३०) श्रीमती मीना साळुंखे, गटविकास अधिकारी, पं. स. आटपाडी

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

समितीने सांगली जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर सर्व संबंधित अधिकारी यांची सन २०११-२०१२ च्या लेखापरिक्षा पुनर्विलोकन अहवालातील व सन २०१२-२०१३ च्या वार्षिक प्रशासन अहवालातील सांगली जिल्हा परिषदेशी सबंधित असलेल्या परिच्छेदांवर साक्ष घेतली.

**मंगळवार, दिनांक १६ ऑक्टोबर , २०१८**

स्थळ : विधान भवन, मुंबई

**उपस्थिती :**

(१) श्री. सुधीर पारवे, वि. स. स. तथा समिती प्रमुख

(२) श्री. बाबुराव पाचर्णे, वि. स. स.

(३) श्री. चरण वाघमारे, वि. स. स.

(४) श्री. रणधीर सावरकर, वि. स. स.

(५) डॉ. देवराव होळी, वि. स. स.

(६) डॉ. सुरेश (भाऊ) खाडे, वि. स. स.

(७) श्री. दिपक चव्हाण, वि. स. स.

(८) श्री. प्रविण दरेकर, वि. प. स.

(९) श्री. विक्रम काळे, वि. प. स.

**निमंत्रित सदस्य :**

श्री. बाळाराम पाटील, वि. प. स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. विलास आठवले, उप सचिव

(२) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव

(३) श्री. मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी

(४) श्री. ह. वि. तामोरे, कक्ष अधिकारी

**स्थानिक निधी लेखापरिक्षा संचालनालय, नवी मुंबई :**

श्री. प्रताप मोहिते, संचालक

**मंत्रालयीन विभागीय सचिव/अधिकारी :**

(१) श्री. श्यामलाल गोयल, अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

(२) श्रीमती वंदना कृष्णा, अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग

(३) श्री. अनुप कुमार, प्रधान सचिव, कृषी व पदुम विभाग

(४) श्री. असिमकुमार गुप्ता, सचिव, ग्रामविकास विभाग

(५) श्री. विवेक नाईक, सचिव, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना

(६) श्रीमती विनिता वेद सिंगल, सचिव, महिला व बालविकास विभाग

(७) श्री. ला. रा. गुजर, सह सचिव, महिला व बालविकास विभाग

(८) श्री. मनोहर ठोंबरे, सह सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग

(९) श्री. संजय बनकर, उप सचिव, ग्रामविकास विभाग

(१०) श्री. युवराज अजेटराव, उप सचिव, गृह विभाग

(११) श्री. किरण पाटील, उप सचिव, कृषी विभाग

(१२) श्री. रविंद्र गुरव, उप सचिव, पशुसंवर्धन विभाग

(१३) श्री. म. रं. शेळके, उप सचिव, मृद व जलसंधारण विभाग

(१४) श्री. दि. मा. सोनवणे, उप सचिव, अल्पसंख्यांक विकास विभाग

(१५) श्री. कांतीलाल उमाप, आयुक्त, पशुसंवर्धन विभाग

(१६) श्री. परमेश्वर बाबर, कक्ष अधिकारी, ग्रामविकास विभाग

(१७) श्री. ॠषीराज कदम, कक्ष अधिकारी, गृह विभाग

(१८) डॉ. म. बा. बनसोडे, व्यवस्थापकीय संचालक, पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर मेंढी व शेळी महामंडळ, पुणे

**जिल्हा परिषद, सांगली :**

(१) श्री. अभिजित राऊत, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली

(२) श्री. चंद्रकांत गजभिये, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली

(३) श्री. जि. रा. पाटोळे, जिल्हा जलसंधारण अधिकारी, सांगली

(४) श्री. विवेक कुंभार, कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली

(५) श्री. विष्णु द. पालवे, अधीक्षक अभियंता, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना, पुणे

(६) श्री. संजय माळी, कार्यकारी अभियंता, अधीक्षक अभियंता, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना, सांगली

(७) श्री. एस. ए. देसाई, अधीक्षक अभियंता, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना, सांगली

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

सन २०११-१२ च्या लेखापरिक्षा पुनर्विलोकन अहवाल व सन २०१२-१३ च्या वार्षिक प्रशासन अहवाल यासंदर्भात सांगली जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात अधिक माहिती मिळविण्यासाठी अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग, प्रधान सचिव, कृषी व पदुम विभाग, सचिव, ग्रामविकास विभाग, सचिव, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना, सचिव, महिला व बालविकास विभाग, सह सचिव, महिला व बालविकास विभाग, सह सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, उप सचिव, गृह विभाग, उप सचिव, ग्रामविकास विभाग, उप सचिव, कृषी विभाग, उप सचिव, पशुसंवर्धन विभाग, उप सचिव, मृद व जलसंधारण विभाग, उप सचिव, अल्पसंख्यांक विकास विभाग, आयुक्त, पशुसंवर्धन विभाग, व्यवस्थापकीय संचालक, पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर मेंढी व शेळी महामंडळ, पुणे व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली यांची साक्ष घेतली.

**बुधवार, दिनांक २७ जानेवारी, २०२१**

स्थळ : विधान भवन, मुंबई

**उपस्थिती :**

(१) श्री. संजय रायमुलकर, वि. स. स. तथा समिती प्रमुख
(२) श्री. कैलास घाडगे पाटील, वि. स. स.
(३) श्री. अनिल पाटील, वि. स. स.
(४) श्री. संग्राम जगताप, वि. स. स.
(५) श्री. हरिभाऊ बागडे, वि. स. स.
(६) श्री. अंबादास दानवे, वि. प. स.
(७) श्री. विक्रम काळे, वि. प. स.

**निमंत्रित सदस्य :**

(१) श्री. किशोर पाटील, वि. स. स.
(२) श्री. बाळाराम पाटील, वि. प. स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. विलास आठवले, उप सचिव
(२) श्री. रंगनाथ खैरे, अवर सचिव (समिती)
(३) श्री. मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी
(४) श्री. ह. वि. तामोरे, कक्ष अधिकारी

**स्थानिक निधी लेखापरिक्षा संचालनालय, नवी मुंबई :**

(१) श्री. प्रताप मोहिते, संचालक, स्थानिक निधी संचालनालय
(२) श्री. कल्याण औताडे, सहाय्यक संचालक, स्थानिक निधी संचालनालय

**मंत्रालयीन विभागीय सचिव/अधिकारी :**

(१) श्री. राजेश कुमार, अपर मुख्य सचिव, ग्रामविकास विभाग
(२) श्रीमती वंदना कृष्णा, अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग
(३) श्री. संजय चहांदे, अपर मुख्य सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग
(४) श्रीमती निलिमा करेकट्टा, प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग
(५) श्री. श्याम तागडे, प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
(६) श्री. एकनाथ डवले, सचिव, कृषी विभाग
(७) श्रीमती आय. ए. कुंन्दन, सचिव, महिला व बालविकास विभाग

**जिल्हा परिषद, सांगली :**

(१) श्री. चंद्रकांत गुडेवार, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली

(२) डॉ. मिलिंद पोरे, जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली

(३) श्री. संभाजी पवार, समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

सन २०११-१२ च्या लेखापरिक्षा पुनर्विलोकन अहवाल व सन २०१२-१३ च्या वार्षिक प्रशासन अहवाल यासंदर्भात सांगली जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात अधिक माहिती अपर मुख्य सचिव, ग्रामविकास विभाग, अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग, अपर मुख्य सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, सचिव, कृषी विभाग, सचिव, महिला व बालविकास विभाग व अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली यांची उर्वरित मुद्यांसंदर्भात साक्ष घेतली.

**शुक्रवार, दिनांक २४ डिसेंबर, २०२१**

स्थळ : विधान भवन, मुंबई

**उपस्थिती :**

(१) श्री. संजय रायमुलकर, वि. स. स. तथा समिती प्रमुख
(२) श्री. कैलास पाटील (घाडगे), वि. स. स.
(३) श्री. शेखर निकम, वि. स. स.
(४) श्री. सुभाष धोटे, वि. स. स.
(५) श्रीमती प्रतिभा धानोरकर, वि. स. स.
(६) डॉ. देवराव होळी, वि. स. स.
(७) श्री. कृष्णा गजबे, वि. स. स.
(८) श्रीमती मेघना बोर्डीकर-साकोरे, वि. स. स.
(९) श्री. किशोर जोरगेवार, वि. स. स.
(१०) श्री. अंबादास दानवे, वि. प. स.
(११) श्री. निरंजन डावखरे, वि. प. स.

**विशेष निमंत्रित :**

(११) श्री. सदाशिव खोत, वि. प. स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. विलास आठवले, उप सचिव
(२) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव
(३) श्री. प्रकाश थिटे, कक्ष अधिकारी
(४) श्रीमती सुषमा लोंढे, कक्ष अधिकारी.

---

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

समितीने बैठकीत दहाव्या अहवालाच्या प्रारूपावर विचार करून ते किरकोळ सुधारणांसह संमत केले.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई